




दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-९९ | सोमवार दि.२९ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### केतन अग्रवालचा खटला उज्ज्वल निकम लढणार

मुंबई : केतन अग्रवाल मृत्यू प्रकरणाने आता निर्णायक वळण घेतले असून, या खटल्यात ज्येष्ठ विधिज्ञ आणि राज्यसभा खासदार उज्ज्वल निकम यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीची पुष्टी स्वत: निकम यांनी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून ही जबाबदारी स्वीकारण्याची विनंती केल्याचे त्यांनी सांगितले.यासंदर्भात प्रतिक्रिया देताना निकम म्हणाले की, या हत्येने संपूर्ण समाज हादरला असून कायद्यावरील नागरिकांचा विश्वास कायम राखण्यासाठी त्यांनी सरकारची विनंती मान्य केली आहे. सध्या या प्रकरणातील तपास सुरू असून, पोलिसांकडून दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर संपूर्ण घटनाक्रम अधिक स्पष्ट होईल. त्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेला वेग येईल, असेही त्यांनी नमूद केले.

### विमानात फडणवीसांची हतबलता दिसली-ठाकरे

परभणी : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज पुहा एकदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतच्या विमान प्रवासावर भाष्य करताना नवा दावा केला आहे. दोन दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे आणि देवेंद्र फडणवीस यांनी एकाच विमानातून प्रवास केला होता. या विमानात दोन्ही नेते आजूबाजूला बसले नसले तरी एकाच रांगेत बसले होते. काल-परवा माझ्यासोबत तिकडे विमानात बसले होते. पण हतबल होते. कळतच नव्हतं की, हे मुख्यमंत्री आहेत, असे काय झाले आहेत? आत्मविश्वास पूर्णपणे गमावलेला हा माणूस. कारण त्यांना कळतंय, आपले पंख कापत आहेत आणि कापणारे आपलेच बॉस आहेत'', असा दावा उद्धव ठाकरे यांनी केला.

### ईडीकडून चौकशी लागली म्हणून तो शिंदे गटात गेला

धाराशिव ;आता मला असेही वाटत आहे की, त्याच्या वडिलांचा जो खून झाला आहे, त्या खुनामागे देखील वेगळं काहीतरी रहस्य आहे असे संजय राऊत म्हणाले. हा गेला कारण पनराजे मल्टिस्टेट या त्याच्या कंपनीने ५०० कोटींचे प्लॉट आख्ख्या धाराशिवमध्ये खरेदी केले. त्याची ईडीकडून चौकशी लागली म्हणून तो शिंदे गटात गेला असल्याचा आरोप संजय राऊतांनी केला. हा घाबरुन शिंदे गटात गेला आहे. वडिलांच्या नावाने स्थापने केलेल्या गरिबांच्या नावाने बनावट खाती उघडून कोट्यावधींचा भ्रष्टाचार केला आहे. तेरणातील भंगार विकून त्याने पैसा खाल्ला असे अनेक गुन्हे केले म्हणू या सगळ्यांची चौकशी लागली. म्हणून हा डरपोक सोंगाड्या पक्ष सोडून गेल्याचे राऊत म्हणाले. आण्ही १५, २० वर्ष एका सापाला दूध पाडले होते. पण आता त्याचा फणा ठेचायची वेळ आली असल्याचे राऊत म्हणाले.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.२५ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९४.०० क्विंटल | २,३५० | २,६५० | २,४६३ |
| ज्वारी/हायब्रिड : ९०.०० क्विंटल | २,३०० | ३,००० | २,६३२ |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | १,८१० | २,०५० | १,९३० |
| तूर : १२.५० क्विंटल | ६,२६२ | ६,२६२ | ६,२६२ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ६,५०१ | ६,५०१ | ६,५०१ |
| बाजरी: ८३.५० क्विंटल | २,००० | ३,६६१ | २,७५२ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:७.५० क्विंटल | ६,५०० | ६,६०० | ६,५५० |
| हरभरा: १०.०० क्विंटल | ५,२७१ | ५,४३० | ५,३५० |

# शक्तीपीठ महामार्ग मागे घ्या; अन्यथा मोठे आंदोलन

## एल्गार मेळाव्यातून राजू शेट्टींचा सरकारला इशारा

सोलापूर । प्रतिनिधी

**राज्यातील प्रस्तावित शक्तीपीठ महामार्गाला होत असलेला विरोध दिवसेंदिवस तीव्र होत असून, या विरोधाला आता पश्चिम महाराष्ट्रातील प्रमुख नेत्यांचीही साथ मिळू लागली आहे. शक्तीपीठ महामार्ग विरोधी समितीच्या वतीने शनिवारी (२८ जून) सोलापूर जिल्ह्यातील करकंब येथे आयोजित करण्यात आलेल्या एल्गार मेळाव्यात सरकारच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाविरोधात जोरदार आवाज उठवण्यात आला. या मेळाव्याला माजी खासदार राजू शेट्टी, काँग्रेसचे नेते सतेज पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी, शेतकरी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



मेळाव्यात बोलताना माजी खासदार राजू शेट्टी यांनी राज्य सरकारवर आणि विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली. कोणत्याही परिस्थितीत शक्तीपीठ महामार्ग होऊ देणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी जाहीर केली. आषाढी एकादशीच्या दिवशी मुख्यमंत्री पंढरपुरात विठ्ठलाच्या साक्षीने शक्तीपीठ महामार्गाचा निर्णय मागे घेत असल्याची घोषणा करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच ही घोषणा झाली नाही तर राज्यभर मोठे जनआंदोलन उभारले जाईल, असा थेट इशाराही त्यांनी दिला. सरकारच्या विकासाच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करताना शेट्टी म्हणाले की, गेली बारा वर्षे सत्तेत असलेल्या सरकारने नेमका कोणता विकास केला, याचे उत्तर जनतेला मिळायला हवे. जलयुक्त शिवार योजनेचे स्वतंत्र ऑडिट झाले तर सरकारच्या कामकाजाची खरी स्थिती समोर येईल, असा दावा त्यांनी केला. नागपूर ते रत्नागिरी या मार्गासाठी आधीच मोठ्या प्रमाणात जमीन उपलब्ध असताना नव्याने हजारो एकर सुपीक शेती संपादित करून शक्तीपीठ महामार्ग उभारण्याची गरज काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. रस्ते उभारण्यापेक्षा राज्यातील सिंचन आणि पाणीप्रश्न सोडवण्यासाठी सरकारने प्राधान्याने प्रकल्प राबवावेत, असा सल्लाही त्यांनी दिला. ◀◀ पान २ वर

# विकासाठी नव्हे तर खासगी निधीसाठी बंडखोरी

## ● उद्धव ठाकरे यांचा बंडखोर खासदारांवर हल्लाबोल

धाराशिव-परभणी । प्रतिनिधी

मागील अनेक वर्षांपासून परभणीला गद्दारी आणि फुटीरतेची पार्श्वभुमी आहे. परंतू येथील मतदार मात्र कायम शिवसेनेसोबत राहील्याचा आपल्याला गर्व वाटतो. ज्या मतदारांनी महाविकास आघाडीला व उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उमेदवाराला खासदार म्हणून निवडून दिले होते त्यांनी मात्र पक्ष व मतदारांसोबत गद्दारी केली. त्यामुळे मी मतदारांची क्षमा मागतो व परभणीकरांनी महापालिकेत आमची सत्ता आणली त्या बद्दल धन्यवाद द्यायला आलो आहे. बंडखोरी केलेले विकासासाठी नाही तर खासगी




निधीसाठी तिकडे गेले असल्याचे सांगत उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बंडखोर खासदारांवर हल्लाबोल केला.

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे मराठवाडा दौ-यावर आले असून शनिवारी रात्री त्यांचे परभणीत आगमन झाले. शहरातील अक्षदा मंगल कार्यालयात रविवार, दि.२८ रोजी त्यांची जाहीर सभा पार पडली. यावेळी पक्ष प्रमुख ठाकरे बोलत होते. यावेळी युवा नेते खा. संजय राऊत, आ. आदित्य ठाकरे, खा. अरविंद सावंत, खा. अनिल देसाई, ◀◀ पान २ वर

# टीईटी पेपर फुटीप्रकरणी आरोपींना आठ दिवसांची पोलीस कोठडी

ठाणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा पेपरफुटी प्रकरणात भिवंडी पोलिसांच्या तपासाला वेग आला आहे. या प्रकरणातील तिन्ही आरोपींना आज न्यायालयात हजर करण्यात आले. पोलिसांनी दहा दिवसांच्या कोठडीची मागणी केली होती. मात्र न्यायालयाने आरोपींना ६ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात आंतरराज्यीय रॅकेट कार्यरत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून आणखी दोन आरोपी फरार असल्याची माहिती तपासातून समोर आली आहे.

राज्य शिक्षक पात्रता म्हणजेच टीईटी पेपरफुटी प्रकरणातील आरोपी धीरज बलराज सिंग (२८, हरियाणा), राजीव साव (४५, बिहार) आणि आकाशकुमार स्वराजकुमार (३०, बिहार) यांना रविवारी भिवंडी जिल्हा व अतिरिक्त सत्र



न्यायालयातील न्यायाधीश एस. एम. सुतार यांच्या सुट्टीच्या न्यायालयात हजर करण्यात आले. तपासादरम्यान आरोपींकडून टीईटी परीक्षेची प्रश्नपत्रिका जप्त करण्यात आल्याचे पोलिसांनी न्यायालयाला सांगितले. तसेच या प्रकरणामागे आंतरराज्यीय रॅकेट असल्याचा संशय असून दोन संशयित आरोपी ◀◀ पान २ वर

# १५ परदेशी विद्यापीठांना भारतात मंजुरी

नवी दिल्ली । वृतसंस्था

भारतात आता परदेशी विद्यापीठाची पदवी घेण्यासाठी परदेशात जाण्याची गरज नाही. केंद्र सरकारने आतापर्यंत १५ परदेशी विद्यापीठांना भारतात कॅम्पस उघडण्यासाठी लेटर ऑफ इंटेंट जारी केले आहे. यापैकी बहुतेक कॅम्पस ऑगस्टपासून पहिली बॅच सुरू करतील.

सुरुवातीच्या टप्प्यात प्रत्येक कॅम्पसमध्ये २०० ते २५० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. पुढील पाच वर्षांत हे प्रमाण वाढवून प्रत्येक कॅम्पसमध्ये वार्षिक १,००० ते १,२०० विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. मुंबई, दिल्ली आणि बंगळुरूमध्ये युनिव्हर्सिटी ऑफ एबरडीन, ब्रिस्टल, यॉर्क, ◀◀ पान २ वर

# पत्नीपीडित पुरुषांनी घातल्या पिंपळाला उलट्या प्रदक्षिणा

छ. संभाजीनगर । प्रतिनिधी

वटसावित्री पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगरमधील वाळूज महानगर येथील करोडी शिवारात आज 'पत्नी पीडित पुरुष आश्रमा'च्या वतीने अनोख्या पद्धतीने 'पिंपळ पौर्णिमा' साजरी करण्यात आली. राज्यातील विविध भागांतून आलेल्या पत्नीपीडित पुरुषांनी पिंपळ वृक्षाचे पूजन करून त्याला उलट्या तब्बल १०८ प्रदक्षिणा



घातल्या. या अनोख्या आंदोलनाच्या माध्यमातून पुरुषांनी आपल्या वैवाहिक आयुष्यातील मानसिक, सामाजिक आणि कायदेशीर समस्यांकडे शासन आणि समाजाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. ◀◀ पान २ वर

# महाराष्ट्रातील २०० भाविक नेपाळमध्ये अडकले

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील विविध भागांतून कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेलेले तब्बल २०० भाविक सध्या नेपाळची राजधानी काठमांडू येथे अडकून पडले आहेत. यात्रेसाठी आवश्यक असलेली सर्व कागदपत्रे, परवानगी आणि प्रक्रिया पूर्ण करूनही चीनकडून व्हिसा मंजूर न झाल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे भाविकांमध्ये चिंतेचे वातावरण असून शासनाकडे मदतीची मागणी करण्यात येत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, यात्रेकरूंनी वेळेत सर्व आवश्यक कागदपत्रे सादर केली होती. तसेच कैलास मानसरोवर यात्रेसाठी लागणारे परमिटही त्यांना मिळाले होते. मात्र, चिनी दूतावासाकडून अद्याप व्हिसा जारी करण्यात आलेला नाही. परिणामी महाराष्ट्रातील सुमारे २०० भाविकांना काठमांडूमध्येच थांबावे लागत आहे. यामध्ये पुणे, मुंबई आणि राज्यातील इतर भागांतील भाविकांचा समावेश आहे.या प्रकरणाची गंभीर दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी अडकलेल्या भाविकांशी दूरध्वनीवरून संवाद साधला. भाविकांच्या ◀◀ पान २ वर

# समृद्धी महामार्गावर भीषण अपघातात पाच ठार

अमरावती । प्रतिनिधी

समृद्धी महामार्गावरून एक अत्यंत धक्कादायक आणि भीषण अपघाताची बातमी समोर आली आहे. अमरावतीच्या धामणगाव रेल्वे तालुक्यातील समृद्धी महामार्गाच्या टोलनाक्याजवळ कार आणि ट्रकचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात वॅगन आर कारमधील एकाच कुटुंबातील ५ जणांचा जागीच मृत्यू झाला आहे. हे सर्व मृत नागरिक चंद्रपूर जिल्ह्यातील रहिवासी आहेत. ◀◀ पान २ वर



# घुले हत्या प्रकरणी स्कार्पिओसह दहावा आरोपी पकडला

केज । प्रतिनिधी

तालुक्यातील टाकळी येथील रहिवाशी असलेल्या विलास घुले या तरुणाचा खुन करण्यात आल्यानंतर या प्रकरणातील ९ आरोपींना बीड पोलीसांनी अटक केली होती. रविवारी दहाव्या आरोपीला केज पोलीसांनी लातूरमधून ताब्यात घेतले आहे तर जवाब मध्ये आलेली पांढरी स्कार्पिओ देखील ताब्यात घेण्यात आली आहे.


विलास घुलेच्या हत्येमुळे राज्यभरात वातावरण ढवळून निघाले आहे. घुलेच्या न्यायासाठी पावसाळी अधिवेशनात आ.धनंजय मुंडे आणि आ.नमिता मुंदडा यांनी आवाज उठवत गुन्ह्याचा सखोल तपास करत आरोपीच्या अटकेची मागणी केली होती. पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांनी या घटनेत स्वत: लक्ष घालून ९ आरोपींना ताब्यात घेतले ◀◀ पान २ वर

# शिवरायांचा काळ जिवंत अनुभवता येणार

## १२ किल्ल्यांवर ऐतिहासिक महोत्सव, मराठी संस्कृतीचं दर्शन घडणार

मुंबई । प्रतिनिधी

**युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ ऐतिहासिक किल्ल्यांवर राज्य शासनाच्या पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागामार्फत भव्य 'गडकिल्ले महोत्सव' आयोजित करण्यात येणार आहेत. महाराष्ट्राच्या दुर्गवैभवाचा जागतिक गौरव साजरा करण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या या उपक्रमासाठी राज्य शासनाने ६० लाख रुपयांच्या खर्चास वित्तीय मान्यता दिली आहे. प्रत्येक किल्ल्यासाठी ५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या**



**निर्णयामुळे वारसा पर्यटनाला नवे बळ मिळणार असून शिवकालीन इतिहास, संस्कृती आणि परंपरेचा जागतिक स्तरावर प्रचार-प्रसार होण्यास मदत होणार आहे.**

मराठा साम्राज्याच्या वैभवशाली इतिहासाची साक्ष देणारे रायगड, शिवनेरी, खांदेरी, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, जिंजी, प्रतापगड, पन्हाळा, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग आणि राजगड या १२ किल्ल्यांचा नुकताच युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेश झाला आहे. या ऐतिहासिक सन्मानानंतर या दुर्गांचे महत्त्व देश-विदेशातील पर्यटकांपर्यंत पोहोचविणे आणि दुर्गसंवर्धनाबाबत जनजागृती निर्माण करणे, या उद्देशाने राज्य शासनाने गडकिल्ले महोत्सव आयोजित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय नुकताच जारी केला आहे. या महोत्सवांमध्ये ◀◀ पान २ वर

# पॅराशूटिंग स्कूलचे विमान कोसळून ११ ठार

टॉम्बलेन । वृतसंस्था

**फ्रान्समधील टॉम्बलेन शहरात रविवारी एक अत्यंत भीषण विमान दुर्घटना घडली. एका पॅराशूटिंग स्कूलचे विमान अचानक कोसळून झालेल्या या भयंकर अपघातात ५ विद्यार्थ्यांसह एकूण ११ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे फ्रान्समध्ये मोठी खळबळ उडाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त विमान हे एका पॅराशूटिंग स्कूलचे होते आणि त्यात प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी व प्रशिक्षकांसह अन्य काही जण प्रवास करत होते.**

आकाशात झेप घेतल्यानंतर नेमके काय घडले, ज्यामुळे विमानाचे संतुलन बिघडले आणि ते थेट जमिनीवर कोसळले, याचे कारण अद्याप समोर आलेले नाही. मात्र हा अपघात इतका भीषण होता की, विमानातील कोणालाही वाचवण्यात यश आले नाही. मृतांमध्ये पाच प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांचा समावेश असल्याची अधिकृत माहिती समोर आली आहे.या घटनेची माहिती मिळताच स्थानिक आपत्कालीन यंत्रणा, बचाव पथके आणि अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. या दुर्घटनेमागचे नेमके कारण ◀◀ पान २ वर

अग्रलेख

# एअर इंडिया बिल्डिंग, नरिमन पॉइंट : विकासाच्या नावाखाली वारशाची शांत विक्री?

मुंबईतील नरिमन पॉइंट येथील प्रतिष्ठित एअर इंडिया बिल्डिंग महाराष्ट्र शासनाने सुमारे ₹१,६०१ कोटींना ताब्यात घेतल्यानंतर केवळ एक स्थावर मालमत्ता हस्तांतरण झालेले नाही, तर शहराच्या ऐतिहासिक स्मृतींच्या संरचनेत एक गंभीर बदल घडून आला आहे. हा व्यवहार केवळ प्रशासनिक सोयीसाठी आहे की विकासाच्या नावाखाली वारसा संपवण्याचा आणखी एक टप्पाहा प्रश्न आता अधिक तीव्रतेने समोर येत आहे.

१९७० च्या दशकात उभारलेली ही २३ मजली इमारत केवळ कॉर्पोरेट कार्यालय नव्हती, तर भारताच्या नागरी विमानसेवेच्या गौरवशाली काळाचे प्रतीक होती. एअर इंडिया, जी एकेकाळी देशाच्या आंतरराष्ट्रीय प्रतिमेचा अभिमान मानली जात होती, तिचे मुख्यालय या इमारतीतून चालत होते. त्या काळात एअर इंडिया केवळ विमान कंपनी नव्हती, तर ''भारतीय आधुनिकतेचे उड्डाण'' मानले जाणारे एक सांस्कृतिक प्रतीक होते. आज त्याच प्रतीकाचा ताबा बदलणे हे केवळ प्रशासकीय हस्तांतरण नसून स्मृतींच्या स्तरावर घडणारा एक मौन भूकंप आहे. राज्य सरकारचा युक्तिवाद साधा आहेमंत्रालय परिसरातील प्रचंड गर्दी कमी करणे, विविध शासकीय विभागांना एकत्र आणणे आणि कार्यक्षम प्रशासन निर्माण करणे. हे उद्दिष्ट तात्त्विकदृष्ट्या योग्य असले तरी प्रश्न असा आहे की, मुंबईसारख्या शहरात प्रत्येक रिकामी किंवा मोक्याची इमारत केवळ ''प्रशासकीय वापरासाठी''च का पाहिली जाते? शहराचा ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि स्थापत्य वारसा हा केवळ उपयोगितेच्या चष्म्यातूनच मोजायचा का? नरिमन पॉइंट हा परिसर मुंबईच्या आधुनिक आर्थिक इतिहासाचा केंद्रबिंदू आहे. येथे उभ्या असलेल्या प्रत्येक इमारतीमध्ये एका काळाचा आर्थिक आत्मविश्वास दडलेला आहे. अशा ठिकाणी एअर इंडिया बिल्डिंगचे अस्तित्व हे केवळ जागेचा वापर नव्हते, तर एका राष्ट्रीय संस्थेच्या प्रतिष्ठेचे प्रतीक होते. आता त्या प्रतीकाचा अंतर्गत उपयोग ''कार्यालयीन विस्तार'' म्हणून होणे ही प्रक्रिया किती अपरिहार्य आहे, यावर गंभीर प्रश्न उपस्थित होतात. इमारत ताब्यात घेतल्यानंतर एअर इंडियाचे लोगो, चिन्हे आणि ओळखचिन्हे काढून टाकण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. हे दृश्य अनेकांसाठी केवळ प्रशासनिक बदल नसून भावनिक आणि ऐतिहासिक विस्थापन आहे. कारण हे चिन्ह केवळ कंपनीचे नव्हते, तर भारताच्या विमानसेवेच्या सुवर्णकाळाचे प्रतिनिधित्व करत होते. या संपूर्ण प्रक्रियेत सर्वात मोठा मुद्दा म्हणजे वारसा व्यवस्थापनाचा अभाव. मुंबईत विकास योजनांचा वेग प्रचंड आहे, परंतु ऐतिहासिक इमारतींचे जतन, पुनर्वापर आणि संवर्धन यासाठी ठोस आणि संवेदनशील धोरणाचा अभाव सातत्याने जाणवतो. एखादी इमारत जुनी झाली की तिच्या ऐतिहासिक मूल्याऐवजी तिच्या ''उपयुक्ततेचा'' विचार केला जातो, आणि तेथूनच वारशाची हळूहळू गळती सुरू होते. एअर इंडिया बिल्डिंगच्या बाबतीतही हेच चित्र दिसते. तिची रचना, स्थान आणि ऐतिहासिक संदर्भ हे तिला केवळ एक मालमत्ता न बनवता शहराच्या ओळखीचा भाग बनवतात. मात्र या ओळखीचा विचार निर्णय प्रक्रियेत किती झाला, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. सरकारी पातळीवर या इमारतीचा उपयोग मंत्रालयातील कार्यालयीन ताण कमी करण्यासाठी केला जाईल, असे सांगितले जाते. पण हा तात्पुरता उपाय दीर्घकालीन शहरी नियोजनाच्या दृष्टीने कितपत योग्य आहे, हे स्पष्ट नाही. मुंबईसारख्या शहरात समस्या ही जागेच्या अभावाची नसून, नियोजनाच्या विस्कळीततेची आहे. एकीकडे खासगीकरण, दुसरीकडे सार्वजनिक मालमत्तेचे पुनर्वाटपया दोन्ही प्रक्रियांमध्ये सामान्यतः आर्थिक आणि प्रशासकीय लाभ पुढे ठेवले जातात, तर सांस्कृतिक स्मृती मागे राहतात. एअर इंडिया बिल्डिंगचा व्यवहारही याच चौकटीत बसतो का, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. या संपूर्ण घडामोडीमध्ये सर्वात चिंताजनक बाब म्हणजे सार्वजनिक चर्चेचा अभाव. अशा महत्त्वाच्या ऐतिहासिक इमारतींच्या भवितव्यावर निर्णय घेताना नागरिक, स्थापत्यतज्ज्ञ, इतिहासकार आणि नागरी संघटना यांचा सहभाग कितपत घेतला गेला, हे स्पष्ट नाही. परिणामी, निर्णय ''कार्यक्षमतेच्या नावाखाली'' घेतले जातात, पण त्यांचा सांस्कृतिक परिणाम दीर्घकाळ टिकतो. एअर इंडिया बिल्डिंग आता नवीन प्रशासकीय उपयोगासाठी तयार होत आहे. परंतु तिच्या भिंतींमध्ये दडलेला इतिहास, तिच्या नावाशी जोडलेली राष्ट्रीय ओळख आणि तिचे स्थापत्य महत्त्व हे सर्व हळूहळू पार्श्वभूमीत जात आहे. विकास आवश्यक आहे, परंतु विकास जर स्मृतींच्या किंमतीवर होत असेल, तर तो किती टिकाऊ आणि अर्थपूर्ण आहे, हा प्रश्न उरतोच.

## पाटोद्यात अल्पवयीन मुलीचा बालविवाह रोखला; नवरदेवासह नातेवाईकांवर गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

**पाटोदा पोलीस ठाणे हद्दीत एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचा होणारा बालविवाह अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने धाडसी कारवाई करत उधळून लावला आहे. या प्रकरणी नवरदेवासह लग्नात उपस्थित असलेल्या नातेवाईकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

दिनांक २७ जून २०२६ रोजी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या प्रभारी अधिकाऱ्यांना पाटोदा पोलीस ठाणे हद्दीत एका १५ वर्षाच्या अल्पवयीन मुलीचा विवाह होणार असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. या माहितीची खातरजमा करून सहाय्यक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे यांच्या नेतृत्वाखालील पथक वेशांतर करून तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांची चाहूल लागताच वऱ्हाडी मंडळींनी अल्पवयीन मुलीला मुलाच्या घरी लपवून ठेवले होते. मात्र, पोलिसांनी सतर्कता दाखवत सर्च ऑपरेशन राबवून मुलगी आणि आरोपी मुलाला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान अभिषेक बाबासाहेब मुंडे याच्यासोबत संबंधित अल्पवयीन मुलीचे लग्न लावण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे स्पष्ट झाले या प्रकारानंतर बालविवाह प्रतिबंधक अधिकारी आणि ग्रामसेवकांना बोलावून घेण्यात आले. त्यांच्या फिर्यादीवरून पाटोदा पोलीस ठाण्यात नवरदेव अभिषेक मुंडेसह लग्नात उपस्थित असलेल्या नातेवाईकांविरुद्ध बालविवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ च्या कलम ९, १०, ११ नुसार गुन्हा (रजिस्टर नंबर १९८/२०२६) दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत आणि अपर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे, एएसआय मीरा रेडेकर, उषा चौरे, महिला पोलीस हवलदार शोभा जाधव, प्रदीप येवले, अशोक शिंदे, सविता चव्हाण, भाऊसाहेब कारले आणि संदीप गर्जे यांच्या पथकाने केली.

## शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या परिसरात पुन्हा पाणी साचले!

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील बार्शी रोडवर असलेल्या शिवाजीनगर पोलीस ठाण्यात पहिल्याच पावसात पाणी साचल्याने पोलीस कर्मचारी आणि ठाण्यात येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होताना दिसून आली. गेल्या वर्षीही झालेल्या मोठ्या पावसामुळे पोलीस ठाण्यात पाणी घुसल्याने महत्वाची कागदपत्र, किंमती दस्तऐवज आणि इतर वस्तूंची मोठ्या प्रमाणावर नासधूस झाली होती. शिवाजीनगर आणि बीड ग्रामीण पोलिस ठाण्याला पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी भेट देऊन पाहणी केली होती. मात्र वर्ष गेले तरी शिवाजीनगर पोलिस ठाण्याची इमारत बांधकाम अथवा



स्थलांतराचा प्रश्न मार्गी लागला नाही.

या संदर्भात माहिती अशी की, नव्याने पोलिस ठाणे मंजुरी मिळाल्यानंतर बार्शी रोडवर, पोलिस अधीक्षक निवास स्थानासमोर पूर्वीच्या जुन्या पोलीस उपअधीक्षक निवासस्थानी सदर ठाणे सुरू करण्यात आले. मात्र आधीच गैरसोय आणि खड्ड्यात असलेल्या या इमारतीत पावसाळ्यात पाणी घुसते. गेल्यावर्षी तर पाणी घुसल्याने मोठे नुकसान झाले होते. दरम्यान शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या इमारतीच्या बांधकामाचा प्रस्ताव पाठविण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. ऐन पावसाळ्याच्या तोंडावर शिवाजीनगर पोलिस ठाण्यातील जप्त वाळू आणि जप्त वाहने अन्यत्र हलविण्यात आली आहेत. दरम्यान या ठिकाणी पाणी साचू नये, यासाठी सार्वजनिक विभागाचे अभियंता उपाययोजना करणार असल्याची माहिती पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांनी दिली.

# वडवणीच्या रामलिंग पतसंस्थेकडून गुणवंतांच्या पाठी कौतुकाची थाप

## आवड व बौध्दीक क्षमतेनुसारच विद्यार्थ्यांनी शिक्षण घ्यावे-चेअरमन नारायणराव डिगे

**वडवणी । प्रतिनिधी**

आजचे युग हे स्पर्धेचे युग जरी असले, तरी या स्पर्धेत इतरांशी स्पर्धा न करता प्रत्येकाने स्वतःशीच स्पर्धा केली पाहिजे. आपली बौध्दीक क्षमता ओळखून सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीनुसारच शिक्षण घ्यावे. आपली आवड व कल विचारत घ्यावा. असे केले तर त्यांच्या यशस्वीतेचा मार्ग अधिक सुकर होईल. यशाचा यशोशिखर जिद्दीने, चिकाटीने व कठोर परिश्रमाने सहजरित्या गाठता येईल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणालाच सर्वोच्च केंद्रबिंदू मानून पुढील वाटचाल करावी. आता जास्त गुण घेतले म्हणजे आपण खुप मोठी गोष्ट केली असे नसते त्यात सातत्य ठेवणे आव्हानात्मक असते. तसेच ज्यांना कमी गुण मिळाले आहेत त्यांनी निराश न होता यापुढे अधिक प्रगल्भतेने जास्तीत जास्त गुण कसे मिळविले जातील यासाठी प्रयत्न करत राहावे. आज रामलिंग पतसंस्थेने गुणवंतांच्या पाठी दिलेली ही कौतुकाची थाप निश्चितपणे आगामी काळात सर्वांना दिशादर्शक ठरेल असे प्रतिपादन रामलिंग पतसंस्थेचे चेअरमन नारायणराव डिगे यांनी गुणवंतांच्या गुणगौरव सोहळ्याप्रसंगी व्यक्त केले. याबाबत अधिक माहिती अशी की, सामाजिक, वैद्यकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक, धार्मिक उपक्रमांमध्ये नेहमी हिरारीने सहभागी होत वडवणी येथील रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था यांच्या वतीने वेळोवेळी सामाजिक बांधिलकी ही जोपासली जाते. वडवणी शहर व तालुक्यातील गुणवंतांचा गुणगौरव सोहळ्याचे आयोजन दरवर्षी रामलिंग पतसंस्थेच्या वतीने करण्यात येते. या अनुषंगाने यावर्षीही दिनांक २५ जून २०२५ गुरुवार रोजी रामलिंग नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभागृहामध्ये इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी बोर्डाच्या व इतर परीक्षेतील वडवणी तालुक्यातील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याला मुख्य अतिथी म्हणून ज्येष्ठ सामाजिक नेते बुवासाहेब शिंदे पाटील व दिनकरराव शेंडगे पाटील हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पतसंस्थेचे चेअरमन नारायणराव डिगे हे उपस्थित होते. तर अतिथी म्हणून वैजनाथ डिगे, शिवाजीराव टकले, अर्जुनराव भंडारे, सुदाम खटावकर सर, कैलास दुधाने सर, गणेश टिकुळे, कचरु रेडेकर, रामेश्वर रेडेकर, रमेशराव टकले, किशोर गळांगे, भागवतराव जाधव, गोरख आळणे, करांडे, प्राध्यापक सोळंके सर व्हाईस चेअरमन अरुणराव गुरसाळी, व्यवस्थापक दिगांबरराव



गुरसाळी, यांसह सर्वश्री संचालक कचरुशेठ झाडे, सर्जेराव आळणे, सुरेशराव ढवळशंक, नवनाथराव म्हेत्रे, प्रकाशराव डिगे, उपमन्यूराव वारे, सुभाषराव वाव्हळ, बाबासाहेबराव मस्के, सिताबाई रामभाऊ डिगे, रंजनाताई शिवाजीराव टकले, शैलजाताई अर्जुनराव भंडारे यांसह पालक, पतसंस्थेचे ग्राहक, सभासद व गुणवंत विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्वप्रथम श्री.चौंडेश्वरी माता यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करुन अभिवादन करण्यात आले. त्यानंतर पतसंस्थेच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून स्वागत सत्कार करण्यात आला. त्यानंतर वडवणी तालुक्यातील सर्व माध्यमिक विद्यालय व महाविद्यालयातील इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी बोर्डाच्या परीक्षेत नेत्रदिपक कामगिरी करत गुणवंत ठरलेल्या एकूण जवळपास ५० च्यावर गुणवंतांचा स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व शाल, पुष्पगुच्छ देवून मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या पालकांचाही गौरव करण्यात आला. गुणगौरव झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रामुख्याने वडवणी तालुक्यातील इयत्ता दहावीतील गुणवंत धनश्री गोरख आळणे, आदित्य श्रीकृष्ण वरवडे, सार्थक कैलास दुधाने, स्वाती किशोर गळांगे, सई अशोक म्हेत्रे, श्रुती रामेश्वर रेडेकर, प्रतिज्ञा सिध्देश्वर कवचट, सानिका भालचंद्र वावधाने, आगम धन्यकुमार जगजिवन, रोहित चंद्रकांत शिंदे, आर्या अभिमन्यू मुरकुटे, श्रावणी बाबासाहेब सोळुंके, सुमित आप्पासाहेब हजारे, सुरज दिगंबर शिंदे, भाग्यश्री संतोष वाघमारे, तसेच इयत्ता बारावीतील गुणवंत दिव्या गोरख आळणे, प्रतीक्षा सतिश कुरकुटे, रोहन रामप्रसाद वरवडे, तनवी सतिश वरवडे, नंदिनी भीमराव डोंगरे, खुशी सुभाषराव थोरात, महादेव रामेश्वर यादव, प्रतिक्षा सदाशिव डोंगरे, सत्यवती सुरेश अंकुशे, अश्विनी अभिमान करांडे, ऋतुजा श्रीकृष्ण नाईकवाडे, स्मिता नितीन दैठणकर, कृष्णा भागवत जाधव, स्नेहा शाहूराव तोंडे, स्वानंदी संतोष झिंक्रे, अधिराज संजय साळुंखे, बळीराम महादेव गार्डी, साक्षी श्रीकृष्ण नांदे, सिध्दी बब्रुवान कदम, रोहिणी शिवाजी डोंगरे, राम राजेंद्र जाधव, आदिती संतोष भंडारे, ज्ञानेश्वरी बाळासाहेब थोरात, शौर्य तेजस शिंदे, अमृता आप्पाराव आंधळे, शुभांगी रामेश्वर फरांडे, श्रेयस सुदाम खटावकर, सिध्दी विठ्ठल खटावकर, हर्षद विष्णू भंडारे, अनुष्का राजेभाऊ टकले, गौरी शिवप्रसाद गुरसाळी, गिता गणेश टिकुळे, अनुष्का किरण ढोले, श्रावणी राजाभाऊ कुरकुटे या गुणवंतांचा गुणगौरव करण्यात आला. त्यासोबत नवोदय विद्यालय,गढी याठिकाणी प्रवेशास पात्र ठरल्याबध्दल पतसंस्थेचे संचालक सुभाषराव वाव्हळ यांची नात व शिक्षक ज्ञानेश्वर सुभाषराव वाव्हळ यांची कन्या कु.मनवा ज्ञानेश्वर वाव्हळ हिचाही विशेष सत्कार करुन पालकांसह गुणगौरव करण्यात आला. यावेळी पुढे बोलतांना चेअरमन नारायणराव डिगे म्हणाले की, सर्व गुणवंतांच्या या नेत्रदिपक यशाचा निश्चितपणे आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. आजचा हा सत्कार तुमचा आणि तुमच्या कर्तुत्वाचा आहे. आपण आगामी काळातही अशाच प्रकारे यशाचे यशोशिखर गाठून आपल्या कुटुंबाचे, गावाचे, जिल्ह्याचे, राज्याचे व देशाचे नाव उज्वल करावे अशाही शुभेच्छा डिगे यांनी गुणवंतांना दिल्या. याप्रसंगी अनेक मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त करुन गुणवंतांना शुभेच्छा देत त्यांचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन व्यवस्थापक दिगांबरराव गुरसाळी यांनी केले तर शेवटी सर्व उपस्थितांचे आभार व्हाईस चेअरमन अरुणराव गुरसाळी यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रामलिंग पतसंस्थेचे कर्मचारी सचिन म्हेत्रे, ईश्वर ढवळशंक, राहूल बागडे, अविनाश वाव्हळ, लखन टिकुळे, गणेश भुजबळ, रत्नमाला सरवदे, अरुणा पारखे, शिवाजी डिगे, अल्पबचत ठेव प्रतिनिधी ज्ञानेश्वर गुरसाळी, ज्ञानेश्वर डिगे, अजय भैरट, विजय हेंद्रे, केशव टकले, डिगांबर झाडे, शिवाजी लोकरे यांनी परिश्रम घेतले.

## पान १ वरून...

### शक्तीपीठ महामार्ग मागे घ्या;

शेतकऱ्यांची जमीन घेऊन विकासाच्या नावाखाली अन्याय केला जात असल्याचा आरोप करत त्यांनी सरकारवर निशाणा साधला. भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरही राजू शेट्टी यांनी सरकारला धारेवर धरले. खोटी वृक्षलागवड दाखवणाऱ्यांकडून व्याजासह पैसे वसूल करण्याचे उच्च न्यायालयाचे आदेश असल्याचे सांगत त्यांनी भ्रष्टाचारावर कठोर कारवाईची मागणी केली. भाजपच्या हिंदुत्वाच्या भूमिकेवरही टीका करत, ''देवावर एवढी श्रद्धा असती तर राम मंदिरातील कथित गैरव्यवहार करणाऱ्यांवर कारवाई झाली असती,'' असे वक्तव्य त्यांनी केले. तसेच उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा उल्लेख करत, राम मंदिर प्रकरणातील दोषींवर बुलडोझर का चालवला गेला नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. भाषणाच्या शेवटी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून राजू शेट्टी म्हणाले, ''मराठी माणूस म्हणून तुम्ही देशाचे पंतप्रधान झालात तर आम्हालाही आनंदच होईल. मात्र ते कर्तृत्वाच्या जोरावर व्हायला हवे. आषाढी एकादशीला विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक झाल्यानंतर शक्तीपीठ महामार्ग रद्द केल्याची घोषणा करा. अन्यथा तुमचे स्वागत वेगळ्या पद्धतीने केले जाईल.'' दरम्यान, करकंब येथील या एल्गार मेळाव्यानंतर शक्तीपीठ महामार्गाचा मुद्दा पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी आला आहे. विरोधकांसह शेतकरी संघटनांनी या प्रकल्पाविरोधातील लढा अधिक तीव्र करण्याचे संकेत दिल्याने सरकार या आंदोलनाकडे कशा पद्धतीने पाहते आणि पुढील भूमिका काय घेते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

------------

### टीईटी पेपर फुटीप्रकरणी आरोपींना

अद्याप फरार आहेत. पेपर नेमका कुठून आला, महाराष्ट्रात आणखी कुठे विक्री करण्यात आली का, आर्थिक व्यवहार कोणकोणाशी झाले आणि या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा तपास करण्यासाठी पोलिसांनी १० दिवसांच्या कोठडीची मागणी केली होती. मात्र, न्यायालयाने ८ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून ६ जुलैपर्यंत आरोपींना पीसीआर देण्यात आला आहे. दरम्यान, आरोपी धीरज सिंगच्या वकिलांनी त्याच्यावर यापूर्वी बॅरिएट्रिक (आतड्याशी संबंधित) शस्त्रक्रिया झाल्याने नियमित औषधोपचाराची गरज असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर पोलिसांनी आवश्यक वैद्यकीय उपचार दिले जात असल्याचे स्पष्ट केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने तिन्ही आरोपींना ६ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. आता या तपासात फरार आरोपींचा शोध, आर्थिक व्यवहार आणि संपूर्ण पेपरफुटी रॅकेटचा पर्दाफाश करण्यावर पोलिसांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

-------------

### विकासाठी नव्हे तर खासगी

माजी खा. चंद्रकांत खैरे, आ. अंबादास दानवे, माजी आ. मिराताई रेंगे, महापौर सय्यद इकबाल, डॉ. विवेक नावंदर यांच्यासह प्रमुख नेते उपस्थित होते. यावेळी ठाकरे म्हणाले, नुकतेच पार पडलेले ऑपरेशन टायगर नसून ते ऑपरेशन देवेंद्र आहे. आमच्या सोबत राहण्याची शपथ घेऊन सुद्धा ती शपथ मोडल्याचे दुष्परिणाम त्यांना दिसून येतील. खाजगी निधीसाठी हे तिकडे गेले आहेत. मिळालेला खासदार निधी कुठे खर्च केला, किती वेळेला लोकसभेत हजेरी लावली, मंत्र्यांना विकास कामासाठी भेटले का याचा अहवाल आमच्याकडे आहे. ज्या प्रायव्हेट विमानातून यांनी प्रवास केला त्यासाठी कोणाचा पैसा खर्च झाला होता या सर्व गोष्टींवर पक्ष प्रमुख ठाकरे यांनी कडाडून प्रहार केला.राम मंदिर स्थापन व्हावे अशी सर्व हिंदूंची इच्छा होती. मात्र, भाजपने रामाच्या नावाने दुकान उघडले आहे. कार सेवकांचा संघर्ष देखील भाजपा विसरली. केवळ मंदिराच्या आडून घृणास्पद कामे केली जात आहेत. राम मंदिरातील चोरी म्हणजे एक प्रकारे हिंदुत्वाशी केलेली गद्दारी असल्याचा आरोप यावेळी पक्ष प्रमुख ठाकरे यांनी केला. मागच्या वेळी अतिवृष्टी झाली तेंव्हा आपण स्वत: शेतक-यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. परंतू यावेळी हा गद्दार आपल्यासोबत नव्हता. केवळ दिखाऊपणासाठी मोर्चात सहभागी झाला होता अशा शब्दात पक्ष प्रमुख ठाकरे यांनी खा. जाधव यांना बंडखोरीवरून फटकारले. यावेळी विधानसभा प्रमुख कल्याणराव रेंगे, जिल्हा प्रमुख विष्णू मुरकुटे, जिल्हा प्रमुख रविंद्र धर्मे, नंदकुमार आवचार, अरविंद देशमुख, सदाशिव देशमुख, राम खराबे, बंडू नाना बिडकर, संतोष बोबडे आदिसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

------------

### महाराष्ट्रातील २०० भाविक नेपाळमध्ये अडकले

अडचणी जाणून घेत त्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे आश्वासन देण्यात आले. तसेच राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या स्तरावरही याबाबत पाठपुरावा सुरू असल्याची माहिती देण्यात आली. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही भाविकांच्या नातेवाईकांनी मदतीची विनंती केली आहे. सर्व कागदपत्रांची पूर्तता करूनही व्हिसा न मिळाल्याने यात्रेकरूंना मोठा मन:स्ताप सहन करावा लागत आहे. परराष्ट्र मंत्रालयाने या प्रकरणाची दखल घेत बीजिंगमधील भारतीय दूतावासाशी संपर्क साधला असून चीन सरकारशी आवश्यक समन्वय सुरू आहे. सोमवारी चिनी दूतावासाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या काठमांडूमध्ये अडकलेले सर्व भाविक सुरक्षित असल्याची माहिती मिळाली आहे.

-----------

### पत्नीपीडित पुरुषांनी घातल्या

गेल्या सात वर्षांपासून आश्रमाच्या वतीने हा उपक्रम सातत्याने राबवला जात आहे. वटसावित्री पौर्णिमेला महिला पतीच्या दीर्घायुष्यासाठी वटवृक्षाची पूजा करतात, तर दुसरीकडे पत्नीकडून त्रासलेले पुरुष या दिवशी एकत्र येत पिंपळाची पूजा करतात. आज झालेल्या या कार्यक्रमादरम्यान उपस्थित पुरुषांनी आपल्या भावना आणि अनुभव मांडले. तसेच कौटुंबिक वादांमुळे पुरुषांच्या वाढत्या आत्महत्येचे प्रमाण, खोट्या तक्रारींमुळे होणारे परिणाम आणि पुरुषांच्या मानसिक आरोग्याचा मुद्दा यावर गंभीर चर्चा करण्यात आली. कार्यक्रमात बोलताना पत्नी पीडित पुरुष आश्रमाचे अध्यक्ष ॲड. भारत फुलारे यांनी सांगितलं की, 'हा संघर्ष कोणत्याही महिलाविरोधात नसून महिला आणि पुरुष दोघांनाही समान न्याय मिळावा, हीच संस्थेची भूमिका आहे. समाजात महिलांच्या प्रश्नांप्रमाणेच पत्नीपीडित पुरुषांच्या समस्याही गांभीर्याने घेतल्या जाव्यात, त्यांच्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी राहावी आणि न्यायव्यवस्थेत संतुलित दृष्टिकोन स्वीकारला जावा', अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली

----------

### १५ परदेशी विद्यापीठांना

इलिनोइस टेक, लिव्हरपूल आणि व्हिक्टोरिया युनिव्हर्सिटीसारख्या संस्था त्यांचे कॅम्पस उघडत आहेत.सध्याच्या सत्रासाठी १० हजारांहून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत. परदेशी विद्यापीठांच्या भारतीय कॅम्पसमध्ये शिक्षण, परीक्षा, मूल्यांकन आणि पदवी पूर्णपणे त्यांच्या मूळ कॅम्पसच्या जागतिक मानकांनुसार असेल. पहिल्या टप्प्यात एआय, कॉम्प्युटर सायन्स आणि एसटीईएम विषयांवर लक्ष केंद्रित केले जाईल. युनिव्हर्सिटी ऑफ एबरडीन (मुंबई), ब्रिस्टल (मुंबई), लिव्हरपूल (बेंगळुरू), यॉर्क (मुंबई), इलिनोइस टेक (मुंबई) आणि व्हिक्टोरिया युनिव्हर्सिटी (दिल्ली) कॅम्पस उघडत आहेत. सध्याच्या सत्रासाठी १० हजारांहून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत. १२ वी मध्ये किमान ७५% आणि पदवीमध्ये ५५% ते ७०% गुण आवश्यक असतील. बोर्ड परीक्षेत इंग्रजीमध्ये ७०% ते ८५% गुण असल्यास आयईएलटीएस देण्याची गरज नाही. शिक्षण, परीक्षा, मूल्यांकन आणि पदवी पूर्णपणे होम कॅम्पसच्या मानकांनुसार असेल. पहिल्या टप्प्यात अक, कॉम्प्युटर सायन्स आणि एसटीईएम विषयांवर लक्ष केंद्रित केले जाईल.एक्सचेंज प्रोग्राम अंतर्गत १ ते २ सेमिस्टर परदेशात शिकता येईल. यॉर्क विद्यापीठाने २+१ मॉडेल आणले आहे. ब्रिस्टल विद्यापीठाचे विद्यार्थी ब्रिटनमधील एआय सुपरकंप्यूटरचाही वापर करू शकतील.पुढील पाच वर्षांसाठी सुमारे १,००० कोटी रुपयांचा निधी ठेवण्यात आला आहे. पात्रता आणि गरजेनुसार १०% ते १००% पर्यंत शिष्यवृत्ती मिळेल. एबरडीन २ लाख आणि ब्रिस्टल १० लाख रुपये वार्षिक शिष्यवृत्ती देईल.परदेशात जाऊन ८० लाख ते १.२ कोटी रुपये खर्च करण्याऐवजी भारतात ३०-४०% कमी खर्च येईल.

--------------

### घुले हत्या प्रकरणी स्कार्पिओसह दहावा

आहे तर पुरवणी जबाबात खा.बजरंग सोनवणे यांच्या मुलाचे नाव आल्यानंतर त्याला शनिवारी एसआयटीने चार तास चौकशीसाठी बोलावले होते. त्याचीही चौकशी सुरू झाली असून रविवारी घुले खून प्रकरणात आरोपी झालेल्या दहाव्या इसमाला केज पोलीसांनी लातूरमधून अटक केली आहे. राजकुमार मोरे (रा.सोनीजवळा) असे त्या आरोपीचे नाव असून त्याची सध्या पोलीसांकडून कसून चौकशी सुरू आहे. आज त्याला न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याचीही माहिती आहे विलास घुलेच्या खून प्रकरणात वापरण्यात आलेली स्कॉर्पिओ (एमएच४४ झेड ९५४२) केज पोलीसांनी जप्त केली आहे. या कारचा घुलेच्या खूनात वापर झाल्याने सध्या ती केज पोलीसांच्या ताब्यात असल्याचे कळते.

---------------

### समृद्धी महामार्गावर भीषण

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित वॅगन आर कार चंद्रपूरवरून मुंबईच्या दिशेने जात होती. समृद्धी महामार्गावरील चॅनल नंबर १०५ च्या नजीक कारने पुढील ट्रकला मागून जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, कारचा चक्काचूर झाला असून कारमधील पाचही जणांचा जागेवरच मृत्यू झाला. या अपघातानंतर महामार्गावर वाहतूक कोंडी झाली होती.या दुर्दैवी अपघातात मृत्यू झालेल्यांमध्ये दोन पुरुष, दोन महिला आणि एका लहान मुलीचा समावेश आहे. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक पोलिस आणि समृद्धी महामार्गाच्या बचाव पथकाने घटनास्थळी धाव घेतली आहे. मृतदेह गाडीब३ाहेर काढून रुग्णालयात पाठवण्याची प्रक्रिया सुरू असून, पुढील तपास पोलिस करत आहेत.

----------

### पॅराशूटिंग स्कूलचे

शोधण्यासाठी उच्चस्तरीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. विमानातील अचानक उद्भवलेला तांत्रिक बिघाड, हवामानातील बदल की मानवी चूक, यापैकी नेमक्या कोणत्या कारणामुळे हा अपघात झाला याचा तपास संबंधित यंत्रणा करत आहेत.

-------------

### शिवरायांचा काळ जिवंत

महाराष्ट्राच्या समृद्ध लोकसंस्कृतीचे दर्शन घडविणारे विविध लोककला प्रकार, पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रम, शिवकालीन इतिहासावर आधारित नाट्यप्रयोग, व्याख्याने, दुर्गसंवर्धन विषयक उपक्रम, ऐतिहासिक प्रदर्शने तसेच किल्ल्यांचा इतिहास उलगडणारे माहितीपर कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. त्यामुळे पर्यटकांना केवळ ऐतिहासिक वास्तूंचे दर्शनच नव्हे, तर शिवकालीन वारशाचा जिवंत अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.युनेस्कोच्या मानांकनानंतर महाराष्ट्राच्या दुर्गवैभवाला जागतिक स्तरावर नवी ओळख मिळाली आहे. आता गडकिल्ले महोत्सवाच्या माध्यमातून हा ऐतिहासिक वारसा अधिक व्यापक स्वरूपात देश-विदेशातील पर्यटकांपर्यंत पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. इतिहास, संस्कृती आणि पर्यटन यांचा संगम घडविणाऱ्या या उपक्रमामुळे वारसा संवर्धनाला गती मिळेल, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल आणि शिवरायांच्या पराक्रमाची गाथा नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

-----------

## सीईओसाहेब आरोग्य सुविधांकडे लक्ष द्या

### चकलांबा आरोग्य केंद्रात उपचाराअभावी रुग्णांना ताटकळत बसावे लागते



बीड । पतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा हे गाव बीडपासून पश्चिमेस ५५ किमी सरहद्दीवर दूर आहे. तेथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सुविधांकडे दुर्लक्ष झाले आहे. या आरोग्य केंद्रातील अधिकारी आणि कर्मचारी मनमानी करत असल्याची तक्रार करण्यात आली आहे.

चकलांबा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दोन वैद्यकीय अधिकाऱ्याची मंजूर पदे आहेत. मात्र वर्षभरापासून येथे कायमस्वरूपी वैद्यकीय अधिकारी नाही. तर कर्मचाऱ्याची रिक्त पदे आहेत. या आरोग्य केंद्रात तात्पुरत्या डॉक्टर'ची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉक्टर अभावी रुग्णांना ताटकळत बसण्याची वेळ आली. मंगळवार बाजार दिवशी रुग्णाची गर्दी असते. मात्र डॉक्टर आणि कर्मचारी उपस्थित राहत नाहीत. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दखल घेऊन कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकारी नियुक्त करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र हे वाऱ्यावर असून या ठिकाणी पदाचा पदाचा अधिकृत वैद्यकीय अधिकारी नाही. कंत्राटी पद्धतीने असलेल्या सीएचओ रुग्ण तपासणी करत आहेत. चकलांबा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील काही कर्मचारी हे कधीच वेळेवर येत नाहीत. पदाचे कायम वैद्यकीय अधिकारी नसल्यामुळे खालचे कर्मचारी उशिराने रुग्णालयात येतात. कर्मचारी उपस्थित नसल्यामुळे अनेक रुग्णांना उपचार अभावी ताटकळत बसावे लागते. आरोग्य केंद्रात आणि परिसरात अस्वच्छता आणि घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. डॉक्टर आणि कर्मचारी उपस्थित राहत नसल्याने रुग्णाचे संख्या घटू लागली आहे.


## टी.सी.हरवला आहे

कार्तिक गणेश पवार या नावाचा इयत्ता १० वी चा टी.सी गेवराई ते जातेगाव प्रवासात हरवला आहे. ज्या कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधाव

-::संपर्क::-

मो.८२७५५७०५८०

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि. २९ जून २०२६


## थोडक्यात



### डॉ.साहिल सत्येंद्र दबडगांवकर यांची एम्स रायपूर येथे एम.डी.रेडीयशन ऑकॉनॉलाजी साठी निवड

माजलगाव । प्रतिनिधी

देशातील प्रतिष्ठेच्या पिजी परीक्षेत ऑल इंडिया रॅक (ए.आय.आर) ३६७ मिळवत डॉ. साहिल सत्येंद्र दबडगांवकर यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्यांची एम्स रायपूर येथे एम डी रेडीयशन ऑकॉनॉलाजी या पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.

डॉ.साहिल यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण श्री सिद्धेश्वर विद्यालय, माजलगाव येथे झाले. इयत्ता ११ वी व १२ वीचे शिक्षण राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे पूर्ण केले. त्यानंतर निट-यु.जी परीक्षेत ऑल इंडिया रॅक ८१२ मिळवत त्यांनी एम्स रायपूर येथे एम.बी.बी.एस अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवला. आता त्याच संस्थेत एम डी रेडीयशन ऑकॉनॉलाजी साठी निवड होऊन त्यांनी आपल्या यशात आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे.त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक व वैद्यकीय कारकिर्दीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

### श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे सोमवार रोजी अक्षय महाराज पिंगळे यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी



विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील अकराव्या पुण्यतिथी जेष्ठ शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प. अक्षय महाराज पिंगळे बीड यांचे सोमवार दिनांक २९ जून २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व मानकुरवाडी ता.जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.

### पिंपळनेर येथे घर पोहोच प्रमाणपत्र वाटप

पिंपळनेर । प्रतिनिधी

तालुक्यातील पिंपळनेर व परिसरातील पाच अपंगांना संकल्प संस्था व माजी पंचायत समिती सदस्य राजेश गवळी यांच्या माध्यमातून घर पोहोच प्रमाणपत्राचे वाटप दि. २६ जून रोजी करण्यात आले. पिंपळनेर येथील राजेश गवळी हे सामाजिक कार्यात अग्रेसर असून गोरगरीब व कष्टकरी समाजातील वंचित घटकासाठी शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यात ती पुढे असतात. गत काही दिवसापासून त्यांनी निराधार, गरीब, विधवा, वंचित नागरिकांना शासनाच्या योजनेचा फायदा मिळवून दिला आहे. नुकतेच त्यांनी पिंपळनेर आणि परिसरातील पाच अपंगांना संकल्प सेवाभावी संस्थतेच्या माध्यमातून घरपोच प्रमाणपत्राचे वाटप केले. दि. २६ जून रोजी छोटेखानी कार्यक्रमात घरपोच अपंगाच्या प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला राजेश गवळी, गोरख कांडेकर, सुभाष सावंत, नंदू बिटे, उद्धव गणगे, गणेश गणगे, शिवाजी काळे, त्र्यंबक होळकर, विलास तायड, मुकुंद वाघे, मच्छिंद्र साठे, श्रीकांत ठोकरे, मच्छिंद्र तिरगुळ सह आदी उपस्थित होते.

## समाजातील दातृत्व हातांचा शोध घेवून अनाथांना शालेय साहित्य वाटप

### बारा वर्षांपासून सुभाष काळे यांचा छत्र हरवलेल्या मुलांना शालेय साहित्य वाटपाचा यज्ञ सुरु

उमापुर । प्रतिनिधी

जे का रंजले गांजले! त्यासी म्हणे जो आपुले तोची साधु ओळखावा देव तेथेची जाणावा या संत तुकारामांच्या उक्ती प्रमाणे उमापुर व परिसरातील छत्र हरवलेल्या अनाथ मुलांना आदर्श शिक्षक सुभाष काळे यांच्या संकल्पेतून गेल्या बारा वर्षांपासून छत्रपती शाहु महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून वर्षभर पुरेल एव्हढे शालेय साहित्य वाटपाचा यज्ञ अखंडपणे सुरू असून बाराव्या वर्षीही तब्बल ९० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य दि. २७ जुन रोजी जिल्हा परिषद शाळा उमापुरच्या प्रांगणात मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मनमंदिर प्रकल्पाचे माधव पवार, सारिखाताई पवार समाजसेवक राजकुमार आग्रवाल, डीवाएसपी अनंतकुमार कुलकर्णी लाभले होते. तर विशेष उपस्थिती उमापुरचे सरपंच किरण आहेर, सेवानिर्वत्त शिक्षण विस्तार अधिकारी लक्ष्मीकांत आटोळे यांची होती.



शालेय साहित्य वितरण कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शाहु महाराज यांच्या प्रतिमापुजनाने झाली.यावेळी कार्यक्रमाचे प्रस्ताविक आदर्श शिक्षक सुभाष काळे यांनी केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की समाजातील दातृत्व हातांचा शोध घेवून अनाथांना शालेय साहित्याचे काम गेल्या १२ वर्षांपासून आपण करत आलेलो आहे.अनेकदा आवश्यकतेपेक्षा पैसा कमी पडतो त्यावेळी मी माझ्या पगारातून हे काम पुर्णत्वास घेवून जात आलेला आहे. सुरूवातीच्या काळमध्ये लोकांमध्ये जागृती नव्हती मात्र आज दाते हे स्वत:हून मदत जाहीर करत असल्याचे समाधान वाटते. यावेळी शाळेतील आदर्श शिक्षक भगवान फुंदे यांनीही आपल्या मनोगतातून काळे सर यांचे भरभरून कौतूक केले. आपल्या परिसरात अशा अनाथ व छत्र हरवलेल्या मुलांना गेल्या बारा वर्षापासून शालेय साहित्य वाटप होत असताना अनेकदा मला यामध्ये सहभाग घेण्याचा योग आल्याचे समाधान येथील सरपंच किरण आहेर यांनी बोलून दाखवला. यावेळी उपस्थित सर्वच मान्यवरांनी आपापले मनोगत व्यक्त केले. मनमंदिर प्रकल्पाचे सारिखाताई पवार यांच्या अध्यक्षीय भाषण झाल्यानंतर ९० विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल एव्हढे साहित्य मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून लाभलेले अण्णासाहेब पवार, केंद्रप्रमुख दिलीप नरोटे, मुख्याध्यापक भक्तराज पौळ, महादेव औटी,आप्पासाहेब महानोर, मुख्याध्यापक ठाकुर, मुख्याध्यापक वळवी,मुख्याध्यापक जुलाह, उमापुर सज्जाचे मंडळ अधिकारी शिरीष डांगे, विनोद कापसे, मऊली पिंगळे, काकासाहेब औटी, विष्णु राठोड, अशोक आहेर, भक्तराज आहेर, पिनुशेठ गाभुड, पत्रकार अमिनभाई शेख, सुरेश आहेर, कृष्णा सामजे,भारत चव्हाण, सुनिल अंदुरे, प्रमोद पवार यांची उपस्थित होती. कार्यक्रमास शाळेतील सर्वच शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

#### ९० विद्यार्थ्यांना ४० हजारांचे साहित्य

उमापुर व परिसरातील छत्र हरवलेल्या अनाथ ९० मुलांना जवळपास ४० हजारांचे शालेय साहित्याचे वाटप छत्रपती शाहु महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधुन मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. सुभाष काळे हे अन्न धान्य बँकेच्या माध्यमातून गोरगरीबांसाठी सातत्याने काम करत असताना अनाथ व छत्र हरवलेल्या मुलांसाठीही ते आग्रही असतात. यावेळी समाजसेवक सुभाष काळे यांचे मान्यवरांनी भरभरून कौतूक केले.

## टीईटी परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करा; परिक्षार्थीच्या भवितव्याशी खेळ थांबवा -बाजीराव ढाकणे

बीड । प्रतिनिधी

राज्यातील शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) संदर्भात समोर आलेल्या कथित पेपरफुटीच्या वृत्तांमुळे लाखो स्पर्धा परीक्षा देणाऱ्या परिक्षार्थी मध्ये प्रचंड संताप, अस्वस्थता आणि निराशेचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी, संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांच्या स्थावर आणि सर्व प्रकारच्या मालमत्ता जप्त करण्यात याव्यात अशी मागणी महा एनजीओ फेडरेशन, महाराष्ट्र राज्यचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे यांनी केली आहे.



प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात बाजीराव ढाकणे म्हणाले की, राज्यात पेपरफुटीच्या घटना आता अपवादात्मक राहिलेल्या नसून त्या वारंवार घडत असल्याने परीक्षा व्यवस्थेवरील परिक्षार्थी चा विश्वास डळमळीत होत आहे. हजारो विद्यार्थी दिवस-रात्र मेहनत करून, आर्थिक अडचणींवर मात करून आणि मोठ्या आशेने स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. मात्र काही समाजकंटक आणि भ्रष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तींच्या कृत्यामुळे त्यांच्या परिश्रमावर एका क्षणात पाणी फिरते.

ते पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या भविष्याशी संबंधित परीक्षा सुरक्षित आणि पारदर्शक पद्धतीने घेणे ही शासन आणि संबंधित यंत्रणांची मूलभूत जबाबदारी आहे. मात्र प्रत्येक वेळी पेपरफुटी किंवा गैरव्यवहाराच्या घटना समोर आल्याने शासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. दोषींना कठोर शिक्षा होत नसल्यामुळे अशा रॅकेटचे मनोबल वाढत असल्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. आज शासन आणि प्रशासकीय यंत्रणेने राजकीय घडामोडींइतकेच गांभीर्य विद्यार्थ्यांच्या भविष्याकडेही दिले पाहिजे. सत्तेचे राजकारण महत्त्वाचे असू शकते, परंतु लाखो तरुणांच्या आयुष्याचा प्रश्न त्यापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे. प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विश्वास टिकवायचा असेल, तर परीक्षा प्रक्रियेत कोणतीही तडजोड होता कामा नये, असे बाजीराव ढाकणे यांनी म्हटले आहे. तसेच त्यांनी परीक्षा प्रक्रियेसाठी अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा, प्रश्नपत्रिका वितरणात तांत्रिक सुरक्षा, संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे आणि पेपरफुटीच्या प्रत्येक प्रकरणाचा जलदगती न्यायालयामार्फत निकाल लावण्याची मागणी केली. दोषींना कठोर शिक्षा झाल्याशिवाय अशा घटनांना आळा बसणार नाही, असेही बाजीराव ढाकणे यांनी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांचे भविष्य कोणत्याही राजकीय समीकरणापेक्षा मोठे आणि मौल्यवान आहे. त्यामुळे टीईटीच्या कथित पेपरफुटी प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, दोषींवर कठोरात कठोर कारवाई करावी आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडणार नाहीत, याची शासनाने ठोस हमी द्यावी, अशी मागणी महा एनजिओ फेडेरेशनचे बीड जिल्हा समन्वयक श्री बाजीराव ढाकणे यांनी केली आहे.

## शेतकरी हक्क मोर्चाचा कर्जमाफी आंदोलनास पाठिंबा - राजेंद्र आमटे

बीड । प्रतिनिधी

शेतकऱ्याला सरसकट कर्जमाफी देण्यात यावी या मागणी करिता शेतकरी हक्क मोर्चाने वारंवार आंदोलने करत आहे. शेतकऱ्याचा सातबारा कोरा करण्यात यावा या मागणी करिता आमदार रोहित पवार पंढरपूर आंदोलनानंतर प्रथमच बीड



जिल्ह्यामध्ये आले असताना शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने रोहित दादा पवार यांचे शेतकऱ्याचे प्रतीक रुमणे देऊन बीड जिल्ह्यात स्वागत करण्यात आले.

आमदार रोहित दादा पवार हे सर्वसामान्य शेतकऱ्यांकरिता न्याय हक्काची लढाई लढत आहे. शेतकरी हक्क मोर्चा हा सुद्धा शेतकऱ्यांसाठी काम करत असल्याने रोहित दादा पवार यांनी शेतकऱ्यांसाठी छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी कर्जमाफी आंदोलन आयोजित केलेले आहे. शेतकरी कर्जमाफी आंदोलनात करिता बीड येथे शेतकऱ्यांशी संवाद साधताना रोहित दादा पवार हे बीडमध्ये आले असताना बीड जिल्ह्यातील शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने संभाजीनगर येथे होणाऱ्या आंदोलनास पाठिंबा असल्याबाबतचे पत्र आमदार रोहित दादा पवार यांची भेट घेऊन देण्यात आले. शेतकरी हक्क मोर्चा हा शेतकऱ्यांच्या हितासाठी, शेतकऱ्यांच्या न्याय मागणीसाठी लढणाऱ्या सोबत आहे. रोहित दादा पवार व रविकांत भाऊ तुपकर हे शेतकऱ्यांसाठी लढत आहेत म्हणून शेतकरी हक्का मोर्चा शेतकऱ्यांसाठी लढणाऱ्या सोबत कायम राहील संभाजीनगर येथील शेतकरी कर्जमाफी आंदोलनास शेतकरी हक्का मोर्चाचा पाठिंबा जाहीर करण्यात येत आहे असे यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, बाळासाहेब मोरे, राजाबाई पठाण, राजाभाऊ साळुंके, अर्जुन सोनवणे, रामधन जमाले, बाळासाहेब शिंदे, दत्ता सुरवसे, पांडुरंगा आवारे, रामचंद्र बर्डे, भाऊसाहेब सपकाळ आदी शेतकऱ्यांच्या वतीने पाठिंबा देण्यात आला.

## माऊली म्हणजे वासल्य आणि विनम्रतेचे प्रतीक होत -विशाल खोले महाराज

बीड । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र चाकरवाडी येथील माऊली म्हणजे वासन्य आणि विनम्रतेचे आदर्श प्रतीक होते ज्यांनी हयात भर नामस्मरण भजन जप किर्तन आणि अखंड अन्नदान ही उपासना केली व आलेल्या प्रत्येक माणसाला आपल्या प्रेम भावभक्तीने आपलेसे केले व त्याला जीवनाच्या उत्कर्षाचा प्रकाशमार्ग दिला

असे श्री विशाल महाराज खोले म्हणाले .

माऊलींचे संस्थान म्हणजे साक्षात अन्नपूर्णा मातेच्या अस्तित्व व अविष्काराचा प्रसाद होय कधीही आलात तर पोट भरून जीव घालणारी जशी आई तसा हा माऊलींचा दरबार आहे

चरित्र लक्षण व महिमा या दृष्टीने संत जीवनाकडे पाहण्याची दृष्टी आपली असावी संताना अनुभवाने ओळखावे त्यांच्या भेटीचा व सानिध्याचा जीवनात आत्म उद्धारासाठी जागरूकतेने उपयोग करून घ्यावा असे खोले महाराज यांनी म्हटले.

श्रीमंत जगद्गुरु तुकोबारायांच्या
धन्य भावशील
ज्याचे हृदय निर्मळ
पुजा प्रतिमेचे देव



संत म्हणती तेथे भाव
विधीनिषेध नेणती
एकनिष्ठा धरून चित्ती
तुका म्हणे तैसे देवा
होणे लागे त्यांच्या भावा

या अभंगावर अत्यंत सुंदर भक्ती प्रचूर असे चिंतन मांडले व विठ्ठल नामाचा व माऊलींचा जयघोष उपस्थित श्रोत्यांच्या साक्षीत्वात केला.यावेळी गुरुवर्य श्री महादेव महाराज तात्या व गुरुवर्य श्री नारायण भाऊ महाराज यांनी श्री खोले महाराज यांचे पुष्पहार अर्पण करून माऊली दरबारात स्वागत केले.

## पत्रकार संरक्षण कायदा लागू करायला सरकार का घाबरतंय? एस. एम. देशमुख यांचा सवाल


मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील पत्रकारांना खासदारच जीवे मारण्याच्या धमक्या आणि अर्वाच्च शिविगाळ करतात, वाळू माफिया आणि गावगुंडाकडून पत्रकारांवर सातत्यानं हल्ले होताहेत , वाढत्या हल्ल्यामुळे पत्रकारांना जीव मुठीत घेऊन काम करावे लागत असताना देखील सरकारने मंजूर केलेला पत्रकार संरक्षण कायदा लागू करायला सरकारला कसली भिती वाटतेय? असा रोखठोक सवाल अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी केला आहे..

पत्रकारांनी १२ वर्षे पाठपुरावा केल्यानंतर २०१७ मध्ये विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात पत्रकार संरक्षण कायद्याचे विधेयक संमत झाले.. त्यानंतर हे विधेयक मंजुरीसाठी राष्ट्रपतींकडे पाठविले गेले,

२०१८ च्या डिसेंबरमध्ये राष्टपतींनी त्यावर स्वाक्षरी केली.. राष्टपतींनी स्वाक्षरी झाल्याने त्याचे रूपांतर कायद्यात झाले.. भारत सरकारच्या गॅंझेटमध्ये देखील ते प्रसिध्द झाले..पत्रकारांना कायदेशीर संरक्षण देणारे देशातील पहिले राज्य म्हणत आम्ही आमची पाठ थोपटून घेतली.. प्रत्यक्षात हा कायदाच अंमलात आला नाही..

कायदा गॅंझेटमध्ये प्रसिध्द झाल्यानंतर राज्य सरकारने एक अधिसूचना काढून हा कायदा अमूक अमूक तारखेपासून लागू झाला असे जाहीर करावे लागते.. मात्र २०१८ ते आज २०२६ म्हणजे जवळपास आठ वर्षे झाली तरी सरकारने असे नोटिफिकेशन काढले नसल्याने पत्रकार संरक्षण कायदा अजूनही महाराष्ट्रात लागू झालेला नाही.. सरकारने अधिसूचना काढून लवकरात लवकर महाराष्ट्रात पत्रकार संरक्षण कायदा लागू करावा यासाठी असंख्य वेळा मुख्यमंत्र्यांची भेट घेतली, निवेदनं दिली, मात्र अजूनही नोटिफिकेशन निघत नसल्याने पत्रकारांवरील हल्ले वाढले असल्याचे वास्तव एस. एम. देशमुख यांनी जगासमोर आणले आहे..




सरकारने केलेला पत्रकार संरक्षण कायदा प्रभावी आहे.. पत्रकारांवर हल्ले केल्यास, त्यांना धमकी दिल्यास या कायद्यान्वये तो अजामीनपात्र गुन्हा ठरतो.. त्यास तात्काळ अटक करण्याची तरतूद आहे.. डीवायएसपी दर्जाचा अधिकारीच या खटल्याची चौकशी करेल, शिवाय हल्लेखोराने कॅमेरा, मोबाईल फोडला, किंवा कार्यालयाची मोडतोड केली तर त्याची नुकसानभरपाई संबंधीत आरोपीकडून वसूल करण्याची तरतूद कायद्यात आहे.. त्यामुळेच कायदा झाला तेव्हा सर्व पत्रकारांनी या कायद्याचे स्वागत केले होते.. दुर्दैवाने अजून हा कायदा लागू होत नसल्याचा आरोप देशमुख यांनी केला आहे..

महाराष्ट्रात पत्रकारांना जीवे मारण्याच्या धमक्या देणारे किंवा हल्ले करणारे बहुतेक लोक हे सत्ताधारी पक्षांशी संबंधित आहेत.. त्यामुळे महाराष्ट्रात हा कायदा लागू केला गेला तर आपलेच लोक अडचणीत येतील अशी भिती सरकारला वाटते काय? असा एस. एम. देशमुख यांनी उपस्थित केला आहे..

संजय दिना पाटील या गुंड खासदाराने परवा पत्रकारांना जिवे मारण्याची धमकी देत शिविगाळ केली.. त्याचा सर्वच पक्षांनी निषेध केला.. त्याचं आम्ही स्वागत करतो, मात्र हे सारे पक्ष सरकारने पत्रकार संरक्षण कायदा अंमलात आणावा म्हणून सरकारकडे आग्रह का धरीत नाहीत असा सवाल करून एस. एम. देशमुख पुढे म्हणतात सध्या विधिमंडळाचे अधिवेशन सुरू आहे.. विरोधी पक्षाच्या आमदारांनी या संबंधी आवाज उठविला आणि सरकारला सभागृहात निवेदन करायला भाग पाडले तर कायदा अस्तित्वात येईल आणि संजय दिना सारख्या मुजोर नेत्यांना पत्रकारांना धमक्या आणि शिव्या देताना दहा वेळा विचार करावा लागेल..

आठ वर्षे झाली, आता जास्त अंत न पाहता तातडीने पत्रकार संरक्षण कायदा लागू करून पत्रकारांना आपले काम निर्भयपणे करता येईल असे वातावरण राज्यात निर्माण करावे ही विनंती एस. एम. देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे..

## पान ६ वरुन...

पान ६ वरुन...

### पल्स पोलिओ मोहिमेचा

मान्यवरांची उपस्थिती

या कार्यक्रमास वैद्यकीय अधीक्षक डॉ. रामदास मोराळे, डॉ. गिरी, डॉ. गुट्टे, जालिंदर पोकळे, नगरसेवक शरीफ शेख, आरोग्य विभागाचे अधिकारी, वैद्यकीय कर्मचारी, आशा सेविका, अंगणवाडी सेविका तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनतेला थेट संदेश

पोलिओमुक्त भारताचे स्वप्न साकार करायचे असेल, तर प्रत्येक पालकाने आपल्या पाच वर्षांखालील बालकाला पोलिओचे दोन थेंब पाजणे अत्यावश्यक आहे. यात कोणतीही हलगर्जीपणा चालणार नाही, असा ठाम संदेश आमदार सुरेश धस यांनी यावेळी दिला.

### टीईटी परीक्षेतील पेपर फुटी

ते पुढे म्हणाले की विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी संबंधित परीक्षा सुरक्षित आणि पारदर्शक पद्धतीने घेणे ही शासन आणि संबंधित यंत्रणेची मूलभूत जबाबदारी आहे मात्र प्रत्येक वेळी पेपर फुटी किंवा गैरव्यवहाराच्या घटना समोर आल्याने शासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे दोषींना कठोर शिक्षा होत नसल्यामुळे अशा रॅकेटचे मनोबल वाढत असल्याची भावना विद्यार्थ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे आज शासन आणि प्रशासकीय यंत्रणेने राजकीय घडामोडी इतकेच गांभीर्य विद्यार्थ्यांच्या भविष्याकडे ही दिले पाहिजे सत्तेचे राजकारण महत्त्वाचे असू शकते परंतु लाखो तरुणाच्या आयुष्याचा प्रश्न त्यापेक्षा अधिक महत्त्वाचा आहे प्रमाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांचा विश्वास टिकवायचा असेल तर परीक्षा प्रक्रियेत कोणतीही तडजोड होता कामा नये असे बबनराव आंधळे यांनी म्हटले आहे तसेच त्यांनी परीक्षा प्रक्रियेसाठी अत्याधुनिक सुरक्षा यंत्रणा प्रश्नपत्रिका वितरणात तांत्रिक सुरक्षा संबंधित अधिकाऱ्याची जबाबदारी निश्चित करणे आणि पेपर फुटीच्या प्रत्येक प्रकरणाचा जलदगती न्यायालया मार्फत निकाल लावण्याची मागणी केली दोषींना कठोर शिक्षा झाल्याशिवाय आशा घटनांना आळा बसणार नाही असेही बबनराव आंधळे यांनी स्पष्ट केले विद्यार्थ्यांचे भविष्य कोणत्याही राजकीय समीकरण करण्यापेक्षा मोठे आणि मौल्यवान आहे त्यामुळे टीईटीच्या पेपर फुटी प्रकरणाची सखोल चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे दोषीवर कठोरात कठोर कारवाई करण्यात यावी आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडणार नाहीत याची शासनाने ठोस हमी द्यावी अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

### सभापती निजाम शेख यांचा

जबाबदारी आहे. प्रत्येक पालकाने आपल्या मुलांना जवळच्या लसीकरण केंद्रावर नेऊन लसीकरण करून घ्यावे. पालकमंत्री नामदार सुनेत्राताई पवार, आमदार विजयसिंहराजे पंडित आणि नगराध्यक्ष प्रेमलाताई पारवे यांच्या संकल्पनेतून एकही बालक पल्स पोलिओ लसीकरणापासून वंचित राहू नये या उद्देशाने नगरपालिका प्रशासन, आरोग्य विभाग तसेच सर्व आरोग्य कर्मचारी सातत्याने प्रयत्नशील असून शहरातील प्रत्येक लसीकरण केंद्रावर प्रभावीपणे मोहीम राबविण्यात येत आहे.

या मोहिमेत आरोग्य विभागातील सर्व अधिकारी, कर्मचारी, आशा सेविका व स्वयंसेवक यांनी सक्रिय सहभाग घेतला. नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपल्या पाच वर्षांखालील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजले. आरोग्य विभागाने सर्व पालकांना आवाहन केले आहे की, आपल्या परिसरातील जवळच्या लसीकरण केंद्रावर जाऊन पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजावेत आणि पोलिओमुक्त बीड, पोलिओमुक्त महाराष्ट्र व पोलिओमुक्त भारत घडविण्यासाठी या राष्ट्रीय मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा.

### उच्च दूध उत्पादनासाठी जातिवंत

मुरघास तयार करताना पहिला थर व्यवस्थित चोपून घेतल्यास तो अधिक काळ टिकतो आणि त्याचा दर्जाही चांगला राहतो. तसेच मुरघासातील प्रथिनांचे प्रमाण तपासण्यासाठी प्रयोगशाळेत चाचणी करणे आवश्यक असून प्रत्येक शेतकऱ्याच्या गोठ्यात किमान ९ ते १२ महिन्यांचा मुरघास साठा उपलब्ध असावा.ते पुढे म्हणाले की, चांगल्या जातिवंत गायीचा जन्म झाल्यानंतर तिचे योग्य संगोपन, संतुलित आहार आणि शास्त्रशुद्ध नियोजन केल्यास ती ४० लिटरपर्यंत दूध देऊ शकते. दूध उत्पादन वाढविण्यासाठी गायीची प्रसूती नैसर्गिक व सुरळीत होणे महत्त्वाचे आहे. अनेकदा गाई दूध कमी देत असल्याची तक्रार केली जाते; मात्र त्यामागे व्यवस्थापनातील त्रुटी हेच प्रमुख कारण असते. आजही सुमारे ९५ टक्के पशुपालक दुग्ध व्यवसाय पूर्णपणे शास्त्रशुद्ध पद्धतीने करत नसल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी डॉ. उपेंद्र मुंडे (सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन तथा तालुका पशुसंवर्धन अधिकारी, आष्टी), श्री. संजय सालुगडे पाटील (अध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह ब्रीडर फार्मर्स असोसिएशन) यांच्यासह राज्यातील विविध भागांतील प्रगतशील दूध उत्पादक श्री. रामनाथ वदक (संगमनेर), श्री. गजानन शेवाळे (धाराशिव), श्री. हरिश येडे (पुणे), श्री. निलेश दहें (कोपरगाव), श्री. बाबासाहेब पवार, श्री. माऊली भिलारे (सातारा), श्री. अशोक हाके (पुणे), श्री. महादेव धुगे (हिंगोली), श्री. वामन गायकवाड (सोलापूर), श्री. रवी हासे (संगमनेर), श्री. संतोष पाटील (चिलेवाडी, सातारा), श्री. जयराम खपके (राहुरी), श्री. जयवंत ताकते (राहुरी), डॉ. चंदन संभेराव (आळेफाटा), श्री. प्रतीक डोखे (कोल्हार), श्री. माणिक पांडे (अकोले) तसेच श्रद्धा ढवण (पारनेर) उपस्थित होते.कार्यक्रमात उपस्थित मान्यवर, प्रगतशील दूध उत्पादक, पदाधिकारी व शेतकरी बांधवांशी संवाद साधत दुग्ध व्यवसायाच्या विकासासाठी अशा मार्गदर्शनपर उपक्रमांची आवश्यकता अधोरेखित केली.

### अप्पर तहसील कार्यालयासाठी

मुख्यालय बीडला जाण्यासाठीही मांजरसुंबा हेच प्रमुख केंद्र आहे. भविष्यात अप्पर तहसील कार्यालयाशी संबंधित कामांसाठी जिल्हा मुख्यालय बीड येथे जावे लागल्यास मांजरसुंबाहून वाहतुकीची अधिक चांगली सुविधा उपलब्ध असल्याने नागरिकांचा वेळ आणि खर्च दोन्हीची बचत होणार आहे. त्यामुळे अप्पर तहसील कार्यालयासाठी मांजरसुंबा या मध्यवर्ती ठिकाणाचा गांभीर्याने विचार करून त्यास प्राधान्य द्यावे, अशी मागणी मांजरसुंबा व संबंधित पाच महसूल मंडळांतील नागरिकांकडून होत असल्याचे अशोक रसाळ यांनी सांगितले. यासंदर्भात लवकरच मांजरसुंबा व परिसरातील तसेच संबंधित पाच महसूल मंडळांतील नागरिकांच्या वतीने जिल्हाधिकारी व तहसीलदार यांची भेट घेऊन निवेदन सादर करण्यात येणार असल्याची माहितीही भाजप तालुकाध्यक्ष अशोक रसाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# उष्णतेमुळे पोल्ट्री व्यवसायाला फटका!

## लेयर कोंबड्यांच्या मरतुकीने अंड्यांचा तुटवडा

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून वाढलेल्या तापमानाचा सर्वाधिक फटका पोल्ट्री व्यवसायाला बसला आहे. उष्णतेमुळे मोठ्या प्रमाणावर लेयर कोंबड्यांची मरतूक झाल्याने अंड्यांच्या उत्पादनात लक्षणीय घट झाली आहे. परिणामी, बाजारात अंड्यांचा तुटवडा निर्माण झाला असून दरात सुधारणा झाली आहे. सध्या अंड्यांचे घाऊक दर प्रति शेकडा ७०० रुपये १० पैशांपर्यंत पोहोचले आहेत. यापूर्वी हेच दर सुमारे ६५० रुपये प्रति शेकडा होते. विशेष म्हणजे दोन महिन्यांपूर्वी अंड्यांचे दर ३५० रुपये प्रति शेकड्यापर्यंत घसरले होते.

पोल्ट्री क्षेत्रातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील अनेक भागांत उन्हाळ्यातील तीव्र उष्णतेमुळे लेयर कोंबड्यांची मोठ्या प्रमाणावर मरतूक झाली. त्यामुळे अंडी देणाऱ्या कोंबड्यांची संख्या घटली असून उत्पादनावर त्याचा थेट परिणाम झाला आहे. साधारणपणे ९० टक्क्यांपर्यंत असलेले अंडी उत्पादन उष्णतेमुळे ६० टक्क्यांपर्यंत खाली आले आहे. परिणामी बाजारातील पुरवठा घटला असून मागणीच्या तुलनेत उपलब्धता कमी पडत आहे. पोल्ट्री व्यावसायिकांच्या मते, महाराष्ट्रात



दररोज सुमारे एक कोटी अंड्यांची मागणी असते. मात्र, उत्पादन घटल्याने ही मागणी पूर्ण करणे कठीण जात आहे. त्यामुळे घाऊक बाजारात दर वाढले असून, किरकोळ बाजारात अंडी डझनाला १०० रुपयांनी विकली जात आहेत. किरकोळ स्तरावर एका अंड्याचा सरासरी दर ९ रुपये असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. दरवाढीमागे केवळ उत्पादनातील घट हेच कारण नसून खाद्यखर्चातील वाढही महत्त्वाची ठरत आहे. कोंबड्यांच्या खाद्यातील प्रमुख घटक असलेल्या सोयापेंडचा दर ३५ ते ४० रुपये प्रति किलोवरून ७० रुपये प्रति किलोपर्यंत वाढला आहे. तसेच मक्याचा दर १८ रुपयांवरून २५ रुपये प्रति किलोपर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे पोल्ट्री उत्पादकांचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. दरम्यान, लेयर फार्मची पुनर्बांधणी करण्यासाठीही वेळ लागत आहे. एक दिवसांच्या पिलांना सध्या मोठी मागणी असून त्यांचाही तुटवडा जाणवत आहे. पिलांसाठी सुमारे तीन महिन्यांचे वेटिंग असल्याचे व्यावसायिकांनी सांगितले. तसेच, पिलाला अंडी उत्पादनासाठी सक्षम होण्यास सुमारे सहा महिने लागतात. त्यामुळे सध्याची उत्पादनातील तूट भरून निघण्यासाठी आणखी काही कालावधी लागण्याची शक्यता आहे.पोल्ट्री क्षेत्रातील जाणकारांच्या मते, लेयर कोंबड्यांची मरतूक, उत्पादकतेतील घट, खाद्यखर्चातील वाढ आणि पिलांच्या तुटवड्यामुळे अंड्यांचा पुरवठा मर्यादित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळातही अंड्यांचे दर चढेच राहण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

## पशुंच्या आहारात हिरव्या चाऱ्याचे महत्व



महाराष्ट्रात पशुपालन व दुग्ध व्यवसाय हा शेतीला पूरक जोडधंदा तसेच अधिक उत्पन्न व आर्थिक स्थैर्य देणारा व्यवसाय म्हणून ओळखला जातो. दुग्ध व्यवसायात मिळणारे उत्पादन हे पशुच्या अनुवांशिकतेवर आणि त्याला देण्यात येणार्या संतुलित आहारावर अवलंबून असते.शेतकऱ्यांमध्ये चारा पिकांच्या सुधारित वाणांच्या लागवडीबाबत असलेल्या अज्ञानामुळे बहुतेक ठिकाणी हिरव्या चाऱ्याची कमतरता ३५ ते ४० टक्के पर्यंत दिसून येते. ज्वारी, मका, बाजरी, चवळी, संकरित नेपिअर, मारवेल गवत, मद्रास अंजन, स्टायलो असा वेगवेगळ्या प्रकारचा हिरवा चारा महाराष्ट्रात आढळून येतो.

पशु आहारात दर्जेदार हिरव्या चाऱ्याचे महत्त्व :जनावरांची निरोगी वाढ व प्रजनन क्षमता टिकवण्यासाठी हिरवा चारा आवश्यक आहे. हिरवा चारा चवदार व पाचक असल्याने आहारातील महत्त्वाचे घटक नैसर्गिक स्वरुपात उपलब्ध झाल्याने जनावराचे शरीराच्या कोणत्याही अवयवावर ताण न येता पचन होते व तापमान नियंत्रित राहण्यास मदत होते. जनावरांच्या आहारात हिरव्या चाऱ्याची कमतरता असल्यास उत्तम खुराक देऊन सुध्दा जनावरांचे उत्पादनक्षम वय व उत्पादन यावर विपरीत परिणाम होवू शकतो. दर्जेदार हिरव्या चारा अभावी गाभण गायींना कमजोर व रोगट वासरे निपजतात. आहारात जास्त प्रमाणात खुराक व कमी प्रमाणात हिरवा चारा असे प्रमाणे जास्त काळ राहिल्यास जनावरांच्या पचन संस्थेवर विपरीत परिणाम होतो.जनावरांना असा द्यावा हिरवा चारा : वरील बाबींचा विचार करून पूर्ण वाढ झालेल्या जनावरास (४०० किलो वजन) गाईला सरासरी २० ते २५ किलो हिरवा चारा (निम्मा एकदल म्हणजेच मका, ज्वारी, बाजरी, संकरित नेपीअर अथवा गवते व निम्मा व्दिदल चारा म्हणजे लसुण घास, बरसीम, चवळी, स्टायलो तसेच ५ ते ६ किलो कोरडा चारा (कडबा, वाळलेले गवत, गव्हाचा भुसा, सरमाड इ.) रोज द्यावा. त्याचबरोबर १.५ ते २.० किलो खुराक, ३० ते ४० ग्रॅम खनिज मिश्रण व दिवसातून २ ते ३ वेळेस पाणी पाजावे, चारा शक्यतो कुट्टी करून द्यावा म्हणजेच चारा वाया जाण्याचे प्रमाण कमी होईल, तसेच चाऱ्याचे पचन चांगले होऊन चारा खाण्यासाठी लागणारी उर्जा कमी प्रमाणात लागेल.

## नारळाच्या शेतीतील धोके आणि योग्य व्यवस्थापन

कल्पवृक्ष म्हणून ओळख असणाऱ्या नारळच्या देखील शेतीवर रोगाचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकरी अडचणीत येत असतात. सतत बदलणारे वातावरण आणि उन्हाच्या वाढत्या तीव्रतेमुळे नारळाची शेती संकटात सापडली आहे. उत्पन्न घेणाऱ्या शेतकऱ्यांच्या पुढे नव्या संकटाला तोंड फुटले आहे. या झाडांवर किडआळीचा प्रादुर्भाव वाढल्याने नारळ उत्पादनात घट होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. शिवाय या रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रसार होणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे नारळाची शेती अडचणीत येऊ नये याकरिता बारामती कृषी विज्ञान केंद्राने या समस्येवर वेळीच प्रतिबंधात्मक उपायोजना राबविण्यासाठी पुढाकार घेतल्याचे सांगण्यात येत आहे. तर याबाबत शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शनशिबीर देखील हाती घेण्यात आली आहेत.

कोकणात सर्वाधिक नारळाची शेती केली जात असून नारळाच्या लागवड क्षेत्रासह उत्पादनात राज्याचा समावेश पहिल्या दहा राज्यांमध्ये आहे. त राज्यातील विविध जिल्हांमध्ये देखील नारळ शेतीचा प्रयोग सुरु असून नारळ लागवडीचे क्षेत्र राज्यात झपाट्याने वाढत आहे. नारळावरील किडीचा प्रादुर्भाव : किडीचा प्रकार प्रथम झाडांच्या झावळ्या पोखरण्याचे काम करतो.



परिणामी झावळ्या सुकून प्रकाश संश्लेषण क्रियेअभावी उत्पादनात घट येते. नारळाच्या खालच्या बाजूच्या पानांवर सुकलेले ठिपके पडतात तर प्रादुर्भाव वाढल्यास पाने जळून मोठे नुकसान होते. शिवाय या किडीचा प्रादुर्भाव लहान मोठ्या सर्व नारळाच्या झाडांवर होत आहे. जास्त प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याने झावळ्या, मोहोर आणि अपरिपक्व नारळाची फळे गळण्याचे प्रमाण वाढते.प्रतिबंधात्मक उपाय : या समस्येवर वेळीच प्रतिबंधात्मक उपाय जोजना राबविण्यासाठी ॲग्रीकल्चरल डेव्हलमेंट ट्रस्ट बारामतीच्या कृषी विज्ञान केंद्राने पुढाकार घेतल्याची माहिती समोर येत आहे. अधिक प्रादुर्भाव पसरू नये म्हणून उन्हाळी हंगामाच्या सुरुवातीलाच प्रथमतः प्रादुर्भावग्रस्त आढळणारी पाने कापून जाळवीत. रासायनिकरित्या फ्रॉन्ड्सच्या खालच्या पृष्ठभागावर मॅलेथिऑन ५० ०.०५% (१/), क्विनॅलफॉस ५० ०.०५%(१/) यांची फवारणी केल्यास प्रादुर्भाव आटोक्यात येतो. नारळावरील या अळीला परजिवीकरण करताना गोनिओझस मित्र किटकांचा वापर करावा. अळ्या परोपजीवींमध्ये, बेथिलिड, गोनिओझस नेफँटिडिस आणि ब्रॅचिमेरिया नोसाटोई-केएयू हे कीड नियंत्रित करण्यासाठी सर्वात प्रभावी आहेत. यामुळे काही विशिष्ट्य प्रकारे जर तुम्ही याकडे लक्ष दिले तर यावर देखील चांगला उपाय सापडून आपले उत्पादन वाढण्यास त्याठिकाणी मदत होणार आहे.

## "रोगमुक्त शेतीसाठी ट्रायकोडर्माचे फायदे आणि वापर"

सद्या सेंद्रिय शेतीमध्ये मोठ्या प्रमाणत वाढ होत आहे तसेच प्रगतशील देशांमध्ये सेंद्रिय शेतीमधील उत्पादनास चांगली मागणी आहे. पिकांवर रोगांचे नियंत्रण करण्याकरिता ट्रायकोडर्मा एक प्रभावी रोग नियंत्रक बुरशी आहे आणि तिचा वापर आपण जैविक शेतीमध्ये रोग नियंत्रणासाठी करू शकतो. अलिकडे रासायनिक बुरशीनाशकाला पर्याय म्हणून ट्रायकोडर्माचा वापर होऊ लागला आहे. ट्रायकोडर्माचा वापर जमिनीत वास्तव्यास असणाऱ्या रोगकारक बुरशी जसे फ्युजॅरियम, रायझोक्टोनिया, स्क्लेरोशियम आणि पिथीयम मुळे उद्भवणारे रोग मर, मुळकूज, खोडकुज तसेच काही बियाण्याद्वारे पसरणाऱ्या रोगांच्या नियंत्रणासाठी करता येतो. हल्ली ट्रायकोडर्माच्या दोन प्रजाती मुख्यतेकरून वापरण्यात येतात ट्रायकोडर्मा हरजीएनम आणि ट्रायकोडर्मा व्हिरीडी. या बुरशींचे संवर्धन २५० ग्रॅम आणि एक किलो पाकिटाच्या स्वरुपात बाजारात मिळते.

ट्रायकोडर्मा अपायकारक बुरशींच्या धाग्यांमध्ये विळखा घालून आपले साम्राज्य पसरविते व नंतर या धाग्यांमध्ये छिद्र करून त्यातील पोषक अन्नद्रव्ये शोषून घेते त्यामुळे अपायकारक बुरशीचा विस्तार थांबतो. ट्रायकोडर्मा अपायकारक बुरशीला मारक ठरणारे व्हिरीडीन प्रतीजैवक सुद्धा तयार करते. अपायकारक बुरशीपेक्षा ट्रायकोडर्माची वाढ लवकर होते त्यामुळे ट्रायकोडर्मा ही बुरशी अन्नद्र्व्यांसाठी अपायकारक बुरशी बरोबर प्रतिस्पर्धा करून अपायकारक बुरशीच्या वाढीसाठी लागणारे कर्ब,



नत्र, व्हिटॅमिन इत्यादी वापरून घेते त्यामुळे अपायकारक बुरशीची वाढ खुंटते.ट्रायकोडर्माचा वापर : प्रामुख्याने ट्रायकोडर्माचा वापर बीजप्रक्रिया, रोपांची प्रक्रिया आणि मातीची प्रक्रिया करण्यासाठी केला जातो. १)बीजप्रक्रिया - पेरणीच्या वेळी बियाण्यावर पाणी शिंपडून १ किलो बियाण्यास ३ ग्रॅम ट्रायकोडर्मा सोबत व्यवस्थितपणे मिसळावे. प्रक्रिया केलेले बियाणे सावलीत वाळवून लगेच पेरणी करावी. २)रोपांची प्रक्रिया - ज्या पिकांची लागवड रोपे तयार करून केली जाते त्या पिकांमध्ये प्रक्रीयेकरिता लागवडीपूर्वी तयार झालेल्या रोपांची मुळे ट्रायकोडर्माची ५०० ग्रॅम भुकटी ५ लिटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्रावणात ५ मिनिटांसाठी बुडवून ठेवावीत व नंतर त्यांची लागवड करावी. ३)मातीची प्रक्रिया - मातीची प्रक्रिया करताना १ ते १.५ किलो ट्रायकोडर्मा २५ ते ३० किलो चांगल्या कुजलेल्या शेणखतात मिसळून १ हेक्टर शेतातील मातीत मिसळावे व शक्य असल्यास पाणी द्यावे. ४) फवारणी - पानावरील बुरशीजन्य रोगांच्या नियंत्रणाकरिता कृषि विद्यापीठांनी विशिष्ट रोगांकरिता केलेल्या शिफारशींचा अवलंब करावा.

ट्रायकोडर्माला अधिक प्रभावी करण्यासाठी उपाय : पाण्याचा व्यवस्थित निचरा असणाऱ्या जमिनीत ट्रायकोडर्माची वाढ जोमाने होते म्हणून जास्त ओलीत करू नये. जमिनीत सेंद्रिय पदार्थ असल्यास ट्रायकोडर्माची वाढ चांगली होते त्याकरिता शेतात चांगले कुजलेले शेणखत टाकावे. ट्रायकोडर्मा बुरशीचे पाकीट/ द्रावण जास्त काळ न ठेवता लवकरात लवकर वापरावे तसेच वापरेपर्यंत त्यांना थंड ठिकाणी सूर्यप्रकाशापासून दूर ठेवावे. तसेच बियाण्यांच्या प्रक्रीयेकरिता ट्रायकोडर्मा सोबत रायझोबियम, ॲझोटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळणारे जीवाणू इत्यादी जैविक खतांचा वापर करता येतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६१३ : इंग्लंड देशातील महान नाटककार शेक्सपिअर यांच्या लंडन स्थित ग्लोब नावाच्या थियेटरला आग लागल्याने जमीनदोस्त झाले.

१७५७ : बंगालचे नवाब मीर जाफर यांनी बंगाल, बिहार आणि ओडिसा प्रांताचे राज्य सांभाळले.

१८७१ : ब्रिटिश पार्लमेंटने कामगार संघटनांना परवानगी देणारा कायदा केला. यापूर्वी कामगार संघटना स्थापन करणार्यांना व अशा संघटनांच्या सदस्यांना ब्रिटनमधून तडीपार करुन ऑस्ट्रेलियात पाठवले जात असे.

१९७४ : इसाबेल पेरेन यांनी अर्जेंटिनाच्या पहिल्या महिला अध्यक्ष म्हणून शपथ घेतली.

१९७५ : स्टीव्ह वोजनियाक यांनी ऍपल -१ संगणकाचे पहिले प्रोटोटाइप तपासले.

१९८० सेशेल्सला (इंग्लंडपासुन) स्वातंत्र्य मिळाले.

१९८६ : आर्जेन्टिना ने १९८६ चा फुटबॉल विश्वकप जिंकला.

१९९५ : दक्षिण कोरियातील सेऊल येथे 'सँपूंग डिपार्टमेंटल स्टोअर'ची इमारत कोसळून ५०२ जण ठार तर ९३७ जखमी झाले.

१९९६ : मेक्सिको देशांत आयोजित फुटबॉल विश्वचषक अर्जेंटिनाने जिंकला.

२००१ : ज्येष्ठ शास्त्रज्ञ कृष्ण दामोदर अभ्यंकर यांना एम. पी. बिर्ला पुरस्कार जाहीर

२००१ : पण्डित हृदयनाथ मंगेशकर यांना 'नटसम्राट बालगंधर्व पुरस्कार' जाहीर

२००७ : ऍपल ने आपला पहिला मोबाईल फोन, आयफोन प्रकाशित केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९३ : प्रोपेलर चे शोधक जोसेफ रोसेल यांचा जन्म. (मृत्यू: ९ ऑक्टोबर १८५७)

१८६४ : शिक्षणतज्ज्ञ व वकिल आशुतोष मुखर्जी यांचा जन्म.

१८७१ : श्रीपाद कृष्ण कोल्हटकर नाटककार, वाङ्मय समीक्षक व विनोदी लेखक (मृत्यू: १ जून १९३४)

१८९१ : डॉ. प. ल. वैद्य प्राच्यविद्यासंशोधक (मृत्यू: २५ फेब्रुवारी १९७८)

१८९३ : प्रसंत चंद्र महालनोबिस भारतीय संख्याशास्त्राचे जनक, 'इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्युट' चे संस्थापक (मृत्यू: २८ जून १९७२)

१९०१ : प्रसिद्ध भारतीय क्रांतिकारक तसचं, काकोरी व दक्षिणेश्वर बॉम्बहल्ला प्रकरणांचे सुत्रदार राजेंद्र लाहिरी यांचा जन्मदिन.

१९०८ : प्रतापसिंग गायकवाड बडोद्याचे महाराज (मृत्यू: १९ जुलै १९६८)

१९२२ : रोमानियन वंशीय सर्बियन कवी वास्को पोपा यांचा जन्मदिन.

१९३४ : कमलाकर सारंग रंगकर्मी, निर्माते, दिग्दर्शक व लेखक (मृत्यू: २५ सप्टेंबर १९९८)

१९४५ : चंद्रिका कुमारतुंगा श्रीलंकेच्या ५ व्या राष्ट्राध्यक्षा

१९४६ : पनामाचे राष्ट्राध्यक्ष अर्नेस्टोपेरेझ बॅलादारेस यांचा जन्म.

१९५६ : पोर्तुगालचे पंतप्रधान पेद्रोसंताना लोपेस यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८७३ : बंगाली कवी मायकेल मधुसूदन दत्त यांचे निधन. (जन्म: २५ जानेवारी १८२४)

१८९५ : थॉमस हक्सले ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ, विज्ञानकथालेखक आणि डार्विनच्या उत्क्रांतिवादाचा खरा समर्थक (जन्म: ४ मे १८२५)

१९६१ : भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेते आणि भारताचे पहिले संरक्षणमंत्री सरदार बलदेव सिंह यांचे निधन.

१९६६ : दामोदर धर्मानंद कोसंबी प्राच्यविद्या पंडित, गणितज्ञ, विचारवंत व इतिहासकार (जन्म: ३१ जुलै १९०७)

१९८१ : दिगंबर बाळकृष्ण तथा दि. बा. मोकाशी साहित्यिक (जन्म: २७ नोव्हेंबर १९१५)

१९९२ : अल्जेरियाचे राष्ट्राध्यक्ष मोहंमद बुदियाफ यांचे निधन.

१९९२ : शिवाजीराव भावे सर्वोदयी कार्यकर्ते (जन्म:)

१९९३ : विष्णुपंत जोग 'चिमणराव-गुंड्याभाऊ' मधील गुंड्याभाऊची भूमिका अमर करणारे गायक अभिनेते (जन्म:)

२००० : कॅप्टन वासुदेव श्रीपाद बेलवलकर ऐतिहासिक कादंबरीकार (जन्म: १८ फेब्रुवारी १९११)

२००३ : कॅथरिन हेपबर्न हॉलिवूड अभिनेत्री (जन्म: १२ मे १९०७)

२०१० : प्रा. शिवाजीराव भोसले विचारवंत, वक्ते व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू (जन्म: १५ जुलै १९२७)

२०१६ : प्लास्टिक कलेसाठी प्रसिद्ध भारतीय पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण पुरस्कार तसचं, कालिदास सन्मान प्राप्त कलाकार के.जी. सुब्रमण्यम यांचे निधन.

## डाळींबाची 'कोण' जात शेतकऱ्यांसाठी उपयुक्त

सध्या डाळींब शेतीला चांगले दिवस आले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना चार पैसे मिळू लागले आहेत. यासाठी योग्य जात महत्वाची आहे. लागवडीमध्ये उच्च उत्पादनासाठी आपण ज्या जातींची लागवड करतो ते अतिशय महत्त्वाच्या असतात.


गणेश : या प्रकारच्या डाळिंबाचे फळ आकाराने खूप मोठी असते. मोठी, साल लाल आणि पिवळ्या रंगाचे मिश्रण असते. बिया मऊ गुलाबी असतात. ही महाराष्ट्रातील व्यावसायिक शेती आहे. एका झाडापासून सरासरी उत्पादन ८ ते १० किलो असते. ही जात १९३६ मध्ये विकसित करण्यात आली. १९७० मध्ये त्याचे नाव ॲलन डी वरून बदलून गणेश असे करण्यात आले. या जातीच्या एका फळाचे वजन २०० ते ३०० ग्रॅम असते. गोड, रसाळ आणि जेवणात रुचकर, त्याच्या दाण्यांचा रंग हलका गुलाबी असतो. एका झाडाला ८ ते १२ किलो फळ मिळते . कमान : हे फळ गणेश जाती पेक्षा लहान असून मऊ बिया असलेले गडद लाल आहे. मऊ : बिया गडद लाल आहेत त्यात मुख्यत: गणेश प्रकाराचा समावेश आहे. बहर : सरासरी प्रत्येक फळांचे वजन सुमारे २५० ते ३०० ग्रॅम असते. मस्कत : या प्रजातीच्या फळांमध्ये गुलाबी बिया असतात. ज्यांचा वरचा भाग लाल असतो. फळांचे वजन सरासरी ३०० ते ३५० ग्रॅम असते. ज्योतिष : हा प्रकार आयआयएचआर, बेंगलोरने विकसित केला आहे.

# राज्यात सुट्टे खाद्यतेल विक्रीस पूर्वीप्रमाणेच परवानगी द्यावी

## ऑइल मिलर्स असोसिएशनचे आ. खोतकर यांना साकडे

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात सुट्टे (लूज) खाद्यतेल विक्रीस पूर्वीप्रमाणे परवानगी द्यावी, यासाठी शासनाकडे पाठपुरावा करावा, असे साकडे जालना जिल्हा ऑइल मिलर्स असोसिएशनच्यावतीने आ. अर्जुनरावजी खोतकर यांना घालण्यात आले असून, त्यांना या संदर्भातील सविस्तर निवेदन सादर करण्यात आले आहे. असोसिएशनचे अध्यक्ष अध्यक्ष संजय सिनगारे, उपाध्यक्ष रवि अग्रवाल, सचिव अंकित अग्रवाल सहसचिव मुकेश अग्रवाल, कोषाध्यक्ष जितेंद्र मुंदडा संपर्क प्रमुख तथा कॅटचे राज्य उपाध्यक्ष सतिष पंच जनता समावेश असलेल्या शिष्टमंडळाने आ. खोतकर यांची भेट घेऊन दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, केंद्र शासनाच्या अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत सुट्ट्या खाद्यतेल विक्रीवर निर्बंध घालण्यात आले असले, तरी भारतातील २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमध्ये आजही सुट्ट्या खाद्यतेलाचे व्यवहार सुरू आहेत. मात्र, महाराष्ट्रात सध्या



या संदर्भात सुरू असलेल्या कडक कारवायांमुळे व्यापारी वर्गात प्रचंड भीती, असुरक्षितता आणि आर्थिक संकटाचे वातावरण निर्माण झाले आहे, असे असोसिएशनने निवेदनात नमूद केले आहे.

महाराष्ट्रातील एक मोठा ग्राहकवर्ग आजही किलो किंवा लिटरच्या प्रमाणात नव्हे, तर आपल्या दैनंदिन बजेटनुसार १०, २०, ३० अथवा ५० रुपयांचे सुट्टे खाद्यतेल खरेदी करतो. यामध्ये प्रामुख्याने शेतमजूर, रोजंदारी कामगार आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा समावेश आहे. सुट्ट्या खाद्यतेल विक्रीवरील निर्बंधांमुळे या गरीब व ग्रामीण ग्राहकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. तसेच, पॅकेजिंगसाठी लागणारे टीन, प्लास्टिक, वाहतूक आणि मनुष्यबळ यांमुळे प्रति किलो अंदाजे १० ते १५ रुपये अतिरिक्त खर्च वाढतो, ज्याचा थेट भार सर्वसामान्य ग्राहकांवर पडत आहे. राज्य शासनाने यापूर्वी सन २०१६ चे २०२० असे तीन वेळेस प्रसिद्ध केलेल्या राजपत्र अधिसूचनांद्वारे सार्वजनिक आणि लोकहिताच्या दृष्टीने सुट्ट्या खाद्यतेल विक्रीस सवलत दिली होती. त्या वेळी शासनाने ग्रामीण भागातील वास्तव परिस्थिती, महागाई आणि सर्वसामान्य ग्राहकांचे हित विचारात घेतले होते. आजही तीच सामाजिक व आर्थिक परिस्थिती कायम असल्याने शासनाने आपल्या विशेष अधिकारांचा वापर करून सुट्ट्या खाद्यतेल विक्रीस पूर्वीप्रमाणे परवानगी द्यावी, जर तातडीने कायमस्वरूपी निर्णय घेणे शक्य नसेल, तर पुढील आदेशापर्यंत तात्पुरती सवलत देण्यात यावी, अशी विनंतीही व्यापाऱ्यांनी केली आहे.

### भेसळ करणाऱ्यांवर कारवाई करा, मात्र प्रामाणिक व्यापाऱ्यांना छळू नका-पंच

खाद्यतेलात भेसळ करणाऱ्यांवर किंवा जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी यास आमचा पूर्ण पाठिंबा आहे. मात्र, अन्न सुरक्षा नियमांचे व गुणवत्ता नियंत्रणाचे पालन करून प्रामाणिकपणे व्यवसाय करणाऱ्या लघु व मध्यम व्यापाऱ्यांना विनाकारण कारवाईला सामोरे जावे लागत असल्याने मोठे संकट निर्माण झाले आहे. या व्यवसायावर हजारो व्यापारी, कर्मचारी, हमाल, टँकर चालक आणि ट्रान्सपोर्टर व त्यांची कुटुंबे अवलंबून असल्याने शासनाने याचा सहानुभूतीपूर्वक विचार करून आवश्यक आदेश निर्गमित करावेत, अशी मागणी यावेळी ऑइल मिलर्स असोसिएशनने संपर्कप्रमुख तथा कॅटचे राज्य उपाध्यक्ष सतीश पंच यांनी आ. खोतकर यांच्याकडे केली.

# जनरल मर्चन्ट तर्फे हस्तीमलजी बंब यांचा भव्य सत्कार

## लहान सहान उद्योग व्यावसायकांनी शासकीय योजनाचा लाभ घ्यावा-बंब



जालना। प्रतिनिधी

जनरल मर्चन्टस्‌? असोसिएशन जिल्हा जालना तर्फे जिल्हाध्यक्ष हस्तीमलजी बंब यांना नुकतेच मुंबई येथे महाराष्ट्र शासन (उद्योग मंत्रालय) तर्फे चड्डचए डींरी आर्वड राज्यस्तरीय प्रथम पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा दि. २७ जून २०२६ रोजी हॉटेल सात्विक भोज चा सभागृहात भव्य सत्कार करण्यात आले. सत्काराचा उत्तर देतांना बंब म्हणाले जनरल मर्चन्ट व्यापारी संघटना जालना शहरात, सर्व तालुक्यात ग्रामीण भागात शाखा उघडण्यात आली आहे. यात दैनंदिन लागणारे वस्तु शालेय साहित्य, सौंदर्य प्रसाधने, प्लास्टीक सामान, खेळणी इमिटेशन ज्वेलरी, ब्युटी पार्लर, गृह उद्योग असे लहान-सहान व्यावसाय करणारे अधिकांक्ष लोग आहे.

यासाठी शासनाची अनेक योजना अनुदान नाममात्र व्याजाने कर्ज मिळतात त्या अनुषंगाने महिला व तरुणांचा अधिवेशन प्रथमच घेण्यात आले होते. त्यात जिल्हा ग्राम उद्योग, अग्रणीय बँक व उद्योग मंत्रालयचे प्रतिनिधींची उपस्थित शासकीय योजनांचा माहिती जनजागरण करण्यात आले. त्यानंतर जिल्ह्यातील जवळपास १०० शंभर प्रस्ताव आले होते. त्याचे एकदिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. काही लोकांना योजना व कर्ज मिळालेले सुध्दा आहे. हे सर्व शासकीय योजना जिल्ह्यांच्या तळा-गळापर्यंत पोहचून लाभ मिळाल्याबद्दल शासनाने दखल घेऊन हा पुरस्कार मला प्रदान केले हे जालना जिह्याला अभिमानाची गोष्ट आहे. हा पुरस्कार माझा एकट्याचा नसुन त्यात सर्वांचे कष्ट व सहयोग आहे. संपूर्ण जिल्ह्यात लहान-सहान व्यापाऱ्यांना संघटनेत समाविष्ट करु. लवकरच सदस्यता अभियान राबविण्यात येईल. उद्योग, गृहउद्योग करणारे महिला, युवक उद्योजक, व्यावसायीकांनी शासकीय योजनेचा लाभ घ्यावा असे बंब म्हणाले.

जगदीश अग्रवाल, सुदर्शन चिप्पा, दुर्गा लड्ढा, शिवाजी तनपुरे यांनी आपले विचार मांडले. या कार्यक्रमासाठी रवि वनवारी, संतोष मुंदडा, निलेश बोरा, श्रीनिवास इंदानी, पुरुषोत्तम सोसे, अब्बास खाँ, संतोष मोरे, अतुल बाकलीवाल आदिंनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन देवेंद्र सावजी यांनी केले. तर आभार सचिव संदीप काबरा यांनी मांडले.

# पाथर्डी तालुक्यात पावसाची धुवांधार बॅटिंग

## विहीर,नदी,नाले,ओढ्याला आले पाणी शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यात रविवारी दुपारी काळे ढग दाटून आले दुपारी एक ते चार जवळपास तीन तास पाथर्डी तालुक्यात वरुन राजाचे जोरदार आगमन होऊन धुवाधार बॅटिंग पाहायला मिळाली रविवारी दुपारी झालेल्या मुसळधार पावसामुळे विहीर ओढे नदी नाले एक होऊन शेतात पाणीच पाणी झाल्याने शेतकऱ्यांमध्ये प्रचंड समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून बाजारपेठ फुलली आहे पाथर्डी तालुक्यातील पूर्व भागातील खरवंडी कासार येथे रविवारी बाजार भरल्याने दुपारी काळे ढग दाटून येताच बाजारात धो धो पावसाला सुरुवात झाल्याने बाजारातील भाजी विक्रेते फळ विक्रेते खाऊ विक्रेते व अन्य व्यापारीवर्ग आणि शेतकऱ्यांमध्ये उत्साह पाहायला मिळाल्याने बाजारातून कोणीही एक इंच भर हटले नाही.

याउलट बाजारात व्यापाऱ्यांसह शेतकऱ्यांनीही पावसाचा मनमुराद आनंद लुटला तब्बल दोन ते अडीच तास मुसळधार पाऊस झाल्याने खरवंडी कासार परिसरासह मालेवाडी भालगाव जांभळी येळी कोरडगाव टाकळीमानुर पाथर्डी शहर तिसगाव करंजी मीरी भागात सर्वदूर मुसळधार पावसाने हजेरी लावल्याने शेतात पाणी साचल्याचे पाहायला मिळाले आहे मिरग सुरू होऊन महिना संपत आला तरी मान्सूनच्या पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण होते परंतु एकूणच रविवारी झालेल्या पावसामुळे कष्टकरी शेतकऱ्याच्या डोळ्यातील अश्रूवर पावसाच्या धारा बरसल्याने उत्साह संचारला असून पेरणीच्या मशागतीच्या व कपास लागवडीच्या कामांना वेग येणार असून खरीप हंगामातील कपास जवारी बाजरी मुग हरभरा उडीद इत्यादी नगदी पिके घेण्यासाठी बी बियाणे घेण्याची लगबग शेतकऱ्यांनी सुरू केली आहे पुढील काही दिवसात अजून अशाच जोरदार पावसाची अपेक्षा शेतकरीराजा करत आहे अशातच पांडुरंगाच्या भेटीसाठी लवकरच आषाढी वारीच्या दिंड्या पंढरपूरकडे प्रस्थान करत असल्याने पांडुरंगाने शेतकऱ्यांना अन्नधान्याने भरभरून हरितक्रांती व्हावी यासाठी समाधानकारक पाऊस पडण्याची अपेक्षा आहे.



# टेंभुर्णी येथे दो बुंद जिंदगी के पल्स पोलिओ लसीकरण मोहीम यशस्वी



पाथर्डी । प्रतिनिधी

टेंभुर्णी येथील सरपंच व शिक्षक नेते मिथुन डोंगरे यांच्या नेतृत्वाखाली पल्स पोलिओ लसीकरण मोहीम रविवारी यशस्वी पूर्ण करण्यात आली यावेळी आशासेविका वंदना नागरे अंगणवाडी सेविका संगीता शिरसाट मदतनीस पुष्पा शिरसाट उपस्थित होते केंद्र शासनाच्या शून्य ते पाच वयोगटातील मुलांना पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेच्या माध्यमातून सशक्त करणे बालक निरोगी ठेवणे या उद्देशाने पल्स पोलिओ लसीकरण मोहीम यशस्वी राबवण्यात आली टेंभुर्णी गावचे सरपंच मिथुन डोंगरे यांनी टेंभुर्णी गावातील आरोग्य शालेय शिक्षण पाणी पथदिवे गावांतर्गत सिमेंट काँक्रिटीकरण रस्ते पिण्यासाठी स्वच्छ पाणी जलजीवन मिशन योजना पाणी आडवा पाणी जिरवा यासाठी कोल्हापूर टाईप बंधारे आणि टेंभुर्णी गावच्या अध्यात्मिक व पर्यटनाच्या दृष्टीने नर्मदेश्वर गडाची स्थापना करून टेंभुर्णी गावाला सामाजिक व समृद्ध स्वरूप देण्याचा प्रयत्न केला आहे.

# टोमॅटो, लसणासह फळभाज्यांना महागाईची फोडणी

अहिल्यानगर

अहिल्यानगर शहर आणि उपनगरातील बाजारपेठेत भाजीपाल्याचे भाव वधारले आहेत. गेल्या काही दिवसांपासून बदललेल्या हवामानाचा आणि अवकाळी पावसाचा थेट परिणाम भाजीपाल्याच्या आवकीवर झाला आहे. परिणामी टोमॅटो, फ्लॉवर, वांगी आणि हायब्रीड लसणाचे भाव कडाडले आहेत. गृहिणींचे बजेट मात्र या दरवाढीमुळे कोलमडले असून, बाजारात फळभाज्यांची खरेदी करताना सर्वसामान्यांना हात आखडता घ्यावा लागत आहे. सर्वाधिक दरवाढ टोमॅटो आणि हायब्रीड लसणाच्या दरात पाहायला मिळत आहे. टोमॅटो ४० रुपयांवरून ६० रुपये किलोवर पोहोचले आहेत, तर हायब्रीड लसूण किलोमागे ३०, तर गावरान लसून किलोमागे ५० रुपयांनी महागला आहे. पालेभाज्यांमध्ये मात्र ग्राहकांना थोडा दिलासा आहे. पालकाची जुडी १० रुपयांवरून पुन्हा २० रुपयांवर आली आहे, तर मेथी आणि कोथिंबीरचे दर स्थिर आहेत. कांदा आणि बटाट्याचे दर २५ रुपये किलोवर टिकून असल्याने सर्वसामान्यांच्या ताटातील मूलभूत घटकांना मात्र सध्या तरी महागाईची झळ लागलेली नाही.


हवामान पूर्ववत होऊन नवीन आवक जोपर्यंत वाढणार नाही, तोपर्यंत हे भाव तेजीत राहण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी वर्तवली आहे.केडगाव उपनगर, नालेगाव परिसरात मोठा बाजार भरतो. मुख्य बाजारपेठेत चितळे रोडवरील भाजीपाला बाजार, तर सावेडी उपनगरातील प्रोफेसर कॉलनी चौक, भिस्तबाग चौक, एकविरा चौक व गुलमोहोर रोडवरील पारिजात चौकाजवळ, बालिकाश्रम रोड, तपोवन रोड, तसेच सिव्हिल हडको परिसरात गणेश चौक, आदी ठिकाणी भाजीपाल्याचे दर महागले आहेत. पालक जुडी - २० रु, मेथी जुडी - ४० रु, कोथिंबीर जुडी - २० रु, शेपू जुडी - ३५ रु, कोबी - ४० रु, फ्लॉवर - ५० रु, काकडी - ३० रु, कांदा - २५ रु, बटाटा - २५ रु, वांगी - ५० रु, कारले - ५० रु, शेवगा - ८० रु, गावरान लसूण - २०० रु, हायब्रीड लसूण - १५० रु, लिंबू - ४० रु, टोमॅटो - ६० रु. नेहरु मार्केट परिसरात भाजीपाला खरेदी करताना महिला ग्राहक वादळी वाऱ्यामुळे झाले नुकसान गेल्या काही दिवसांमध्ये झालेल्या अचानक वादळी वारे आणि हवामान बदलाचा मोठा फटका शेतीला बसला.

# 'नशा'साठी वापरण्यात येणाऱ्या १०८० गोळ्या जप्त

जालना। प्रतिनिधी

दहशतवाद विरोधी पथकाने शहरात नशेसाठी वापरण्यात येणा-या १०८० बटन गोळया जप्त करुन बटन गोळयाचे मोठे रॅकेट उध्वस्त केले. दिनांक २७.०६.२०२६ रोजी मा.श्री. तेघबीर सिंह संधु पोलीस अधीक्षक तसेच मा. विक्रम साळी, अप्पर पोलीस अधीक्षक, यांनी अवैधपणे बटन गोळया विक्री करण-या विरुध्द कारवई करणे बाबत आदेशीत करण्यात आले होते. त्या अनुषंगाने गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर बातमी मिळाली माहितीवरून विशाल कॉर्नर परिसरातील संघर्ष हॉटेल समोर येथे एक इसम मानवी जिवीतास अपायकारक तसेच नशेकरीता गैरवापर करण्यात येणा-या बटण गोळया ची चोरटी विक्री करत आहे.

त्यावरुन त्यास ताब्यात घेवुन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव शेख




अफसर शेख अन्वर वय २७ वर्षे रा.दुःखीनगर जुना जालना असे सांगीतले त्यास सदरच्या बटण गोळया कोणाकडून आणल्या असे विचारले असता त्याने सदरच्या गोळया विशाल यांची वसंत मेडीकल पाणीवेसरोड काद्राबाद यांचेकडून खरेदी केल्याचे सांगीतले. त्याप्रमाणे वसंत मेडीकल चालक व आरोपी यांचेकडून बटन गोळ्या जप्त करण्यात आले आहे. याप्रकर पोलीस ठाणे कदिम जालना गुरंन ३४५/२०२६ कलम १२३, २७८BNS सह कलम 8(),22 8(C),22 (A)NDPS Act १९८५ सह कलम १८ (अ),18 (c),27 (b) (ii)१८ (),१८,२७ औषधी व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० प्रमाणे जप्त मुददेमाल ७५३००० रुपये किमंतीच्या Anzilum0.5, Alprazonam Tablets IP0.5mg चे लेबल असलेले १५ गोळ्या (टैबलेट) असलेल्या स्ट्रिप असे एकुण १६ स्ट्रिप मधील २४० टेबलेट प्रत्येक स्ट्रिप ची किमंत ४७.११/- रुपये असे असलले. २) १००००-०० रुपये किमंतीचा VIVOकंपनीचा निळया रंगाचा मोबाईल ३५८०-०० रुपये किमंतीच्या ०.५, ०.५चे लेबल असलेले १५ गोळ्या (टॅबलेट) असलेल्या स्ट्रिप असे एकुण ७६ स्ट्रिप मधील ८४० टैबलेट प्रत्येक स्ट्रिप ची किमंत ४७.११/- रुपये असे असलले. ८०००-०० रुपये किमंतीचा कंपनीचा काळया रंगाचा मोबाईल , २२३३३-०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी शेख अफसर शेख अन्वर वय २७ वर्षे रा.दुःखीनगर जुना जालना, विशाल वय ४८ वर्ष रा. वसंत मेडीकलच्या वर पाणीवेस रोड, काद्राबाद, जालना सदरची कारवाई मा.श्री. तेघबीर सिंह संधू पोलीस अधिक्षक , मा.विक्रम साळी, अपर पोलीस अधीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली, दहशतवाद विरोधी शाखेचे प्रभारी अधिकारी सपोनि सचिन इंगेवाड, व सपोउपनि मोराती शिवरकर, पोहेकों/ विनोद गडघे, पोहेकों/ कैलास कुरेवाड, पोहेको/ महेन्द्र सोनवणे, पोहेकों दिपक बडुरे तसेच श्री. जीवन जाधव अन्न व औषध प्रशासन, जालना यांनी संयुक्तपणे केली आहे.

# जिल्हा न्यायालयाच्या आवारातील जुन्या इमारतीवर तडे

## पावसाळ्यात सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर, स्ट्रक्चरल ऑडिटची मागणी





बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा न्यायालयाच्या आवारातील जुन्या न्यायालयीन इमारतीची अवस्था दिवसेंदिवस चिंताजनक बनत असून, इमारतीच्या विविध भागांवर मोठे तडे पडल्याचे दिसून येत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या इमारतीच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित होत असून, कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी होत आहे.

पूर्वी जिल्हा व सत्र न्यायालयाचे कामकाज याच इमारतीत चालत होते. त्यानंतर न्यायालयाचे कामकाज त्याच आवारातील नव्या न्यायालयीन इमारतीत स्थलांतरित करण्यात आले. जुन्या इमारतीपासून सुमारे २०० फूट अंतरावर नवीन न्यायालयीन इमारत कार्यरत असली, तरी जुनी इमारत आजही न्यायालयाच्या आवारात असून तिच्यात सार्वजनिक बांधकाम विभाग, भूसंपादन कार्यालय, उप विभागीय अधिकारी कार्यालयासह विविध शासकीय कार्यालये कार्यरत आहेत.

या परिसरात दिवसभर न्यायालयीन कामकाजासाठी येणारे वकील, पक्षकार, अधिकारी, कर्मचारी आणि सर्वसामान्य नागरिकांची मोठी वर्दळ असते. त्यामुळे जुन्या इमारतीत कार्यरत शासकीय कार्यालयांमध्ये येणाऱ्या नागरिकांसह संपूर्ण न्यायालयीन परिसरातील सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे.

सदर इमारतीच्या भिंती, खांब आणि इतर संरचनात्मक भागांवर अनेक ठिकाणी मोठ्या भेगा पडलेल्या दिसत आहेत. काही ठिकाणी प्लास्टर निखळले असून काँक्रीट उघडे पडल्याचेही चित्र आहे. पावसाळ्यात या तड्यांमधून पाणी झिरपल्यास इमारतीच्या संरचनेवर आणखी परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे इमारतीच्या सुरक्षिततेची तांत्रिक तपासणी करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, या इमारतीतच सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यालय कार्यरत आहे. शासकीय इमारतींची देखभाल, दुरुस्ती आणि सुरक्षिततेची जबाबदारी असलेल्या विभागाचे कार्यालय याच इमारतीत असताना, या इमारतीच्या संरचनात्मक स्थितीची पाहणी करून आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

जुन्या इमारतीत अनेक शासकीय कार्यालये कार्यरत असल्याने अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांचा नियमित वावर सुरू आहे. अशा परिस्थितीत कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी संबंधित यंत्रणांनी अधिकृत स्ट्रक्चरल ऑडिट करून इमारत वापरण्यास सुरक्षित आहे की नाही, याबाबतचा अहवाल जाहीर करावा. आवश्यक असल्यास दुरुस्ती, मजबुतीकरण अथवा पर्यायी व्यवस्था तातडीने करावी, अशी मागणी नागरिक, वकील आणि न्यायालयीन परिसरात येणाऱ्या नागरिकांकडून होत आहे.

कोणतीही दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा संभाव्य धोका ओळखून वेळेत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे न्यायालयाच्या आवारातील या जुन्या इमारतीचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करून आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# गळक्या एसटी बसमुळे प्रवाशांचे हाल धारूर डेपोच्या बसची दुरावस्था उघड

किल्लेधारूर । प्रतिनिधी

धारूर बस डेपोच्या एमएच २० बीएल २३०० क्रमांकाच्या एसटी बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना रविवारी मोठा मनस्ताप सहन करावा लागला. अंबाजोगाई व धारूर मार्गावर पावसादरम्यान बसच्या छताला मोठ्या प्रमाणात गळती लागल्याने बसमध्ये पावसाचे पाणी झिरपत होते. परिणामी बसमधील अनेक प्रवासी अक्षरशः भिजून गेले. या प्रकारामुळे प्रवाशांनी संताप व्यक्त करत एसटी प्रशासनाच्या देखभाल व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

धारूर बस डेपो हा जिल्ह्यात उत्पन्नाच्या बाबतीत नेहमीच अव्वल क्रमांकावर राहतो. प्रवाशांकडून नियमित महसूल मिळत असतानाही बसच्या देखभाल-दुरुस्तीकडे होत असलेले दुर्लक्ष संतापजनक असल्याची भावना प्रवाशांनी व्यक्त केली. पावसाळा सुरू होण्यापूर्वी बसची तपासणी करून छतावरील गळती, खिडक्यांमधील दोष व इतर तांत्रिक त्रुटी दूर करणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात गळक्या बस प्रवाशांच्या सेवेत धावत आहेत. एकीकडे इंधन दरवाढ, देखभाल खर्च आणि इतर कारणांचा दाखला देत प्रवासी भाड्यात वेळोवेळी वाढ केली जाते, मात्र त्याच्या बदल्यात सुरक्षित, स्वच्छ आणि आरामदायी प्रवासाची सुविधा मिळत नसल्याची खंत प्रवाशांनी व्यक्त केली. पावसात ओले होऊन प्रवास करावा लागल्याने लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी प्रवाशांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागला. संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रकाराची गंभीर दखल घेऊन एमएच २० बीएल २३०० या बसची तातडीने दुरुस्ती करावी किंवा तिच्या ऐवजी सुस्थितीतील बस उपलब्ध करून द्यावी, तसेच डेपोतील इतर बसचीही तपासणी करून अशा घटना पुन्हा घडू नयेत, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

# पल्स पोलिओ मोहिमेचा आष्टीत शुभारंभ

## आ. धस यांचे कडक आवाहन - एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू देणार नाही!

आष्टी । प्रतिनिधी

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचा आष्टी शहरात उत्साहात शुभारंभ झाला. आष्टी ग्रामीण रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटर येथे आज सकाळी ७.४५ वाजता आयोजित कार्यक्रमात आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या हस्ते बालकांना पोलिओचे दोन थेंब पाजून मोहिमेची औपचारिक सुरुवात करण्यात आली.

दोन थेंब जीवनाचे... प्रत्येक पालकाने जबाबदारी पार पाडावी



यावेळी बोलताना आमदार सुरेश धस यांनी पालकांना स्पष्ट शब्दांत आवाहन केले की, पाच वर्षांखालील एकही बालक पोलिओ लसीकरणापासून वंचित राहू नये. पोलिओसारख्या गंभीर आजाराचे संपूर्ण उच्चाटन करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आरोग्य विभागाला सहकार्य करणे ही सामाजिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

आरोग्य यंत्रणा सज्ज; गावागावांत लसीकरण मोहीम

मोहिमेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आरोग्य विभागाने व्यापक नियोजन केले असून गावागावांत, वाड्या-वस्त्यांवर आणि प्रत्येक घरापर्यंत पोहोचून पात्र बालकांना पोलिओचे डोस दिले जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# टीईटी परीक्षेतील पेपर फुटी प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करा - बबन आंधळे

बीड । प्रतिनिधी



दिनांक २८ ६ २०२६ राज्यातील शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) संदर्भात समोर आलेल्या पेपर फुटी प्रकरणामुळे लाखो स्पर्धा परीक्षा देणाऱ्या परीक्षार्थी मध्ये प्रचंड संताप अस्वस्थता आणि निराशेचे वातावरण निर्माण झाले आहे या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषीवर कठोर कारवाई करण्यात यावी संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांच्या स्थावर आणि सर्व प्रकारच्या मालमत्ता जप्त करण्यात याव्यात अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात केली आहे ते म्हणाले की राज्यात पेपर फुटीच्या घटना आता अपवादात्मक राहिलेल्या नसून त्या वारंवार घडत असल्याने परीक्षा व्यवस्थेवरील परीक्षार्थींचा विश्वास ढळमळीत होत आहे हजारो विद्यार्थी दिवस-रात्र मेहनत करून आर्थिक अडचणीवर मात करून मोठ्या आशेने स्पर्धा परीक्षांची तयारी करतात मात्र काही समाजकंटक आणि भ्रष्ट प्रवृत्तीच्या व्यक्तीच्या कृत्यामुळे त्यांच्या परिश्रमावर एका क्षणात पाणी फिरते ◀◀ पान ३ वर

# तेजस अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटीत राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी

बीड । प्रतिनिधी

तेजस अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., बीड येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीनिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

यावेळी संस्थेचे चेअरमन ड. प्रकाश दादा कवठेकर यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सामाजिक न्याय, शिक्षण, समता आणि सर्वसामान्यांच्या उन्नतीसाठी शाहू महाराजांनी दिलेल्या योगदानाचा गौरव उपस्थित मान्यवरांनी यावेळी केला. या कार्यक्रमास संस्थेचे सचिव रामदास ठोसर, उपाध्यक्ष दत्ता घरात, मुख्य कार्यकारी अधिकारी सचिन दिघे, शाखा व्यवस्थापक गणेश सातपुते, अविनाश मोरे तसेच संस्थेचे सर्व सन्माननीय संचालक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी राजर्षी शाहू महाराज यांच्या विचारांचा वारसा जपत समाजहित आणि ग्राहकाभिमुख सेवा अधिक प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प उपस्थितांनी व्यक्त केला.

# अप्पर तहसील कार्यालयासाठी मांजरसुंबाच सर्वात योग्य पर्याय -तालुकाध्यक्ष अशोक रसाळ

बीड । प्रतिनिधी



तालुक्यासाठी अप्पर तहसील कार्यालयाचा प्रस्ताव मंजूर झाला असून सध्या हरकती व सूचना मागविण्याची प्रक्रिया सुरू आहे. या पार्श्वभूमीवर अप्पर तहसील कार्यालयासाठी चौसाळा की नेकनूर यावर दोन्ही गावांमध्ये वाद सुरू आहे. मात्र, संबंधित पाच महसूल मंडळांतील नागरिकांच्या सोयीचा विचार करता अप्पर तहसील कार्यालयासाठी मांजरसुंबा हाच सर्वात योग्य व सर्वमान्य पर्याय असल्याचे मत तालुकाध्यक्ष अशोक रसाळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे व्यक्त केले आहे.

अशोक रसाळ म्हणाले की, अप्पर तहसील कार्यालय मांजरसुंबा येथे झाल्यास चौसाळा परिसरातील गावांना सुमारे १५ किलोमीटर, तर लिंबागणेश व येळम घाट परिसरातील गावांना केवळ १० ते १२ किलोमीटर अंतर प्रवास करावा लागेल. याउलट अप्पर तहसील कार्यालय चौसाळा किंवा नेकनूर येथे झाल्यास इतर महसूल मंडळांतील नागरिकांना अधिक अंतराचा प्रवास करावा लागेल आणि त्यांची गैरसोय होईल. मांजरसुंबा हे दोन राष्ट्रीय महामार्गांनी जोडलेले महत्त्वाचे केंद्र असून येथे उत्तम दळणवळण व्यवस्था, वीज, पाणी, मोठी हॉटेल्स, बाजारपेठ तसेच सर्व प्रकारच्या शासकीय व व्यावसायिक सुविधा उपलब्ध आहेत. सुमारे ६० ते ७० गावांतील नागरिकांचा दैनंदिन संपर्क मांजरसुंबाशी असतो. प्रस्तावित पाच महसूल मंडळांतील बहुतांश नागरिकांची रोजची ये-जा याच ठिकाणी होत असून जिल्हा ◀◀ पान ३ वर

# सभापती निजाम शेख यांचा पल्स पोलिओ मोहिमेत सक्रिय सहभाग; सर्व लसीकरण केंद्रांना भेट

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री सुनिता वहिनी अजित दादा पवार व आमदार विजयसिंह पंडित, नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे यांच्या मार्गदर्शनाखाली आज बीड शहरात विविध लसीकरण केंद्रांवर उत्साहपूर्ण वातावरणात मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. मोमीनपुरा आरोग्य केंद्र येथे आरोग्य व स्वच्छता सभापती श्री. निजाम शेख यांच्या हस्ते बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजून मोहिमेची औपचारिक सुरुवात करण्यात आली.



मोमीनपुरा आरोग्य केंद्रात मोहिमेचा शुभारंभ; पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्याचे सभापती शेख निजाम यांचे आव्हान

यावेळी मोमीनपुरा आरोग्य केंद्राच्या मेडिकल ऑफिसर डॉ. हाश्मी यांच्यासह सर्व वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, परिचारिका, आशा सेविका व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. लसीकरणानंतर पालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे महत्त्व पटवून देत प्रत्येक पाच वर्षांखालील बालकाला लस देण्याचे आवाहन करण्यात आले.

यानंतर आरोग्य व स्वच्छता सभापती श्री. निजाम शेख यांनी बीड शहरातील विविध शासकीय दवाखाने व पल्स पोलिओ लसीकरण केंद्रांना भेटी देत मोहिमेचा आढावा घेतला. प्रत्येक केंद्रावरील लसीकरणाची व्यवस्था, उपस्थित आरोग्य कर्मचारी व लाभार्थी बालकांची माहिती जाणून घेत त्यांनी आरोग्य विभागाच्या कार्याचे कौतुक केले. तसेच कोणतेही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही, यासाठी अधिकाधिक जनजागृती करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी सभापती श्री. निजाम शेख यांनी सांगितले की, पाच वर्षांखालील प्रत्येक बालकाला पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब मिळणे ही आपल्या सर्वांची सामूहिक ◀◀ पान ३ वर

# पेठ बीड डीबी पथकाचा जुगार अड्ड्यावर छापा २.०७ लाखांचा मुद्देमाल जप्त, सहा जुगारी ताब्यात

बीड । प्रतिनिधी

बीड शहर व परिसरात वाढत असलेल्या अवैध जुगार व्यवसायावर पेठ बीड पोलिसांनी मोठी कारवाई करत बलभीम नगर परिसरातील जुगार अड्ड्यावर छापा टाकला. या कारवाईत सहा जुगाऱ्यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून रोख रक्कम, पत्ते व इतर जुगार साहित्य असा एकूण २ लाख ७ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांना गुप्त माहिती मिळाली होती की, बलभीम नगर परिसरात काही जण पत्त्यांच्या




माध्यमातून जुगार खेळत आहेत. या माहितीच्या आधारे रविवारी (दि. २८ जून २०२६) सापळा रचून छापा टाकण्यात आला. कारवाईदरम्यान सहा जण जुगार खेळताना आढळून आले. त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख व पोलीस उपअधीक्षक वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निलेश केळे यांच्या आदेशानुसार करण्यात आली. या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक मन्सूर शहा यांच्यासह पो.नितीन राठोड, पो.ह.अल्ताफ शेख, पो.शिवाजी राख, पो.विष्णू गुजर, पो.पांडुरंग परझणे यांनी कारवाई केली. शहरात वाढत्या जुगार व्यवसायावर पोलिसांनी सुरू केलेल्या या कारवाईमुळे अवैध धंदे चालविणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# उच्च दूध उत्पादनासाठी जातिवंत गाई, शास्त्रशुद्ध व्यवस्थापन आणि मुरघास आवश्यक-डॉ. शैलेश मदने

## आ. सुरेश धस यांच्या उपस्थितीत मोरेश्वर मंगल कार्यालयात दुग्ध व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात

आष्टी । प्रतिनिधी

दुग्ध व्यवसाय हा केवळ जोडधंदा नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारा शाश्वत उद्योग आहे. हा व्यवसाय अधिक फायदेशीर करायचा असेल तर गोठ्यात किमान ३५ ते ४० लिटरपेक्षा अधिक दूध देणाऱ्या उच्च दर्जाच्या जातिवंत गाई असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय विक्री व्यवस्थापक तथा दुग्ध व्यवसाय तज्ज्ञ डॉ. शैलेश मदने यांनी केले.

मोरेश्वर मंगल कार्यालय येथे आयोजित दुग्ध व्यवसाय, मुरघास व्यवस्थापन आणि पशुपालनातील आधुनिक तंत्रज्ञान या विषयावरील मार्गदर्शन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमास आमदार सुरेश धस यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी, दूध उत्पादक आणि पशुपालक उपस्थित होते.

डॉ. मदने यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील प्रत्येक गोठ्यात सुमारे १० ते २० टक्के गाई अंगावर सांभाळाव्या लागतात. त्यामुळे गोठ्यात उच्च दूध उत्पादन देणाऱ्या उत्कृष्ट वंशाच्या गाई असणे अत्यंत गरजेचे आहे. योग्य आहार, संतुलित पोषण, शास्त्रशुद्ध व्यवस्थापन आणि नियोजनबद्ध प्रजनन यांचा अवलंब केल्यास गायींची दूध देण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढविता येते. मुरघास (सायलेज) निर्मितीबाबत मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, ◀◀ पान ३ वर



# नॅशनल ऑलिम्पियाड परीक्षेत यशवंत मस्केची जिल्हास्तरीय दुसऱ्या लेव्हलच्या मेरिटमध्ये निवड, प्रमाणपत्र देऊन केला गौरव

पात्रुड । प्रतिनिधी

सिंदफणा पब्लिक स्कूलचा विद्यार्थी यशवंत एकनाथ मस्के याने नॅशनल ऑलिम्पियाड परीक्षेच्या जिल्हास्तरीय दुसऱ्या लेव्हलमध्ये मेरिटमध्ये स्थान मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. त्याच्या या यशाबद्दल शाळेत आयोजित कार्यक्रमात त्याला प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी सिंदफणा पब्लिक स्कूलचे प्राचार्य अन्वर सर यांच्या हस्ते यशवंत मस्के याला प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या प्रसंगी त्याचे पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून त्याचे अभिनंदन केले. यशवंतच्या यशामुळे शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत आणखी भर




पडली असून त्याने इतर विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण केला आहे.यावेळी प्राचार्य अन्वर सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवण्यासाठी सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि आत्मविश्वास आवश्यक असतो. नॅशनल ऑलिम्पियाडसारख्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक क्षमतेला वाव देतात आणि त्यांच्यात स्पर्धात्मक वृत्ती विकसित करतात.कार्यक्रमाला यशवंत मस्के यांचे पालक एकनाथ मस्के , शिक्षक व शाळेतील कर्मचारी उपस्थित होते. उपस्थितांनी यशवंतच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत पुढील वाटचालीसाठी प्रेरणा दिली. सिंदफणा पब्लिक स्कूल विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने विविध उपक्रम राबवत असून अशा यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही स्पर्धा परीक्षांकडे प्रेरणा मिळत असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26